परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १०९ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०१७
Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सस्नेह नमस्कार.***

दि. ११ डिसेंबर २०१६ ला स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात आपण मोठ्या उत्साहाने 'आमची पंच्याहत्तरी' कार्यक्रम साजरा केला.

उपस्थित सर्व ज्येष्ठ कुलबांधव, कुलभगिनी यांचा सत्कार करण्याचे भाग्य मराठे प्रतिष्ठानला लाभले. या सर्व वयोवृद्ध ज्येष्ठांचे आशिर्वाद मिळाले. 'मी मिठाची बाहुली' हा श्री. विश्वास सोहोनी प्रकाशित आणि कलासुगंध निर्मित कार्यक्रम अतिशय देखणा झाला. कै. वंदना मिश्र यांच्या नामवंतांनी गौरविलेल्या आत्मचरित्रावर आधारीत हा कार्यक्रम मानसी कुलकर्णी आणि श्री. उदय नेने यांनी समर्थपणे सादर केला. हा कार्यक्रम ऐकताना उपस्थित वयोवृद्ध त्यांच्या जुन्या स्मृतींत रमले, एका वैभवशाली काळाचे प्रतिबिंब या कार्यक्रमात पाहायला मिळाले.

गुरुवार दि. २६ जानेवारी २०१७ला मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३८ वा वर्धापन दिन आनंदात व संगीतमय वातावरणात संपन्न झाला. श्री. विजय बागूल यांनी 'माऊथ ऑर्गन' वाद्य संगिताद्वारे अनेक सुंदर जुन्या हिंदी बोलपटातील अर्थपूर्ण, सुरीली गाणी दिमाखदार नजाकतीने पेश केली. उपस्थितांना सुश्राव्य गाण्यांच्या मैफलीचा आनंद दिला. सौ. वृषाली बागूल यांचे निवेदनही गाण्यांना पूरक असे उत्तम होते. पुण्याच्या नवीन कार्यकारिणीचा परिचय झाला. कार्यकारिणीत निवडून आलेल्या सर्वांचे अभिनंदन करते. गूळपोळीच्या आस्वादाने कार्यक्रमाची गोड सांगता झाली. या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी (एम.डी. आणि सीईओ) श्री. रविंद्र प्रभाकर मराठे उपस्थित होते.

असे हे दोन दर्जेदार कार्यक्रम आपल्या सर्व कुलबांधवांच्या उपस्थितीने शोभिवंत ठरले. असो. मंडळी, मार्च महिन्याचा 'हितगुज' ही नेहमीप्रमाणे आपल्याशी संवाद साधायला आला आहे. दि. ८ मार्च हा 'विश्व महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून बडोद्याच्या गायकवाड राजर्षी घराण्यातील घडामोडींबद्दलचा 'स्त्री स्वातंत्र्य' हा श्री. सदाशिव बळवंत मराठे यांचा उद्बोधक लेख, आणि 'विजयी डॉ. विजया वाड' हा श्यामला (जाईल) पुरंदरे यांचा लेख प्रकाशित करीत आहोत. मोहनराव मराठ्यांनी लिहिलेला 'चहापुराण' हा लेख म्हणजे उत्कृष्ट ललित गद्य आहे. तो चहाप्रेमींना तर आवडेलच पण चहा न पिणारे ही 'चहाबाज' होऊ शकतील. भावेभक्त, चित्रपट समीक्षक कै. वा.य. गाडगीळ सांगायचे सौभाग्यवतीने कधी कुंकवाला नाही म्हणायचे नसते तसे चहा विचारल्यावर चहाला कधी नाही म्हणायचे नसते. हिंदुमहासभेचे भूतपूर्व अध्यक्ष आणि 'प्रज्वलंत'चे संपादक स्वर्गीय श्री. विक्रम सावरकर म्हणत डॉक्टरांनी कधी मला सलाईनसाठी सुई टोचली तर रक्त बाहेर येण्याऐवजी चहाच बाहेर येईल. सौ. वृषाली वामन मराठे यांचेही 'पंचाहत्तरी' या लेखात प्रांजळ आत्मनिवेदन आहे. श्रीमती सुनंदा अरुण मराठे यांचा नोकरीच्या वेळी आलेला अनुभव विलक्षण आहे. असो.

अभिनयसम्राज्ञी मीनाकुमारी हा हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील शीलालेख. 'परिणीता' पासून 'पाकीजा' पर्यंतच्या अविस्मरणीय चित्रपटांमधील तिच्या सर्वांगसुंदर अभिनयाचा आलेख, विख्यात छायालेखक डॉ. वि.स. जोग यांच्या 'अभिनयसम्राज्ञी' या लेखात आहे. पुण्यातील आपले बाळ मराठे यांचा मुकेश यांच्या कारकीर्दीविषयक लेखही तितकाच वाचनीय. या लेखांमुळे 'हितगुज'ची उंची वाढली आहे, हे निश्चित. मंडळी आपणा सर्वांना होळीच्या, वर्षप्रतिपदा-गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देते. नवीन वर्ष सुखाचे, समृद्धीचे उत्तम आरोग्याचे जावो, ही कुलदेवतेकडे प्रार्थना करते.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. १४ फेब्रुवारी २०१७)

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# क्षणचित्रे

रविवार दि. ११ डिसेंबर २०१६ला 'आमची पंच्याहत्तरी' कार्यक्रम दणक्यात साजरा केला तो ही मनाने चिरतरुण असलेल्या वृद्ध कुलबांधव - भगिनींनी. खरोखर ही मराठे प्रतिष्ठानाला अभिमान वाटावा अशी गोष्ट आहे. मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ श्री. वा. ग. मराठे यांच्या मनात अशा प्रकारची कल्पना आली ती प्रत्यक्षात साकार झाली. वा.ग. यांचा वाढदिवस दि. १० डिसेंबरचा; पण रविवार असल्याने सर्वांनी यावे म्हणून दि. ११ डिसेंबरला कार्यक्रम केला.

श्री. वा.ग. यांच्या गळ्यात त्यांची सौभाग्यवती वृषाली यांनी पुष्पहार घातला. वा.गं.नी आवडती नारळाची बर्फी खाऊन तोंड गोड केले. सौ. वृषाली वहिनींना चांदीचे सुबक, सुंदर, नाजूक कमलपुष्प भेट म्हणून दिले. कळव्याचे श्री. चिंतामण मराठे (वय वर्षे ८२) यांनी खणखणीत आवाजात शांतीपाठ पठण केले. त्यामुळे वातावरण पवित्र आणि प्रसन्न झाले. त्यांनी म्हटलेल्या मंत्रोच्चारांचे सामर्थ्य एवढे होते की चित्तात, तनामनात ते रूजले. उपस्थित सर्व पंच्याहत्तरींच्या कुलबांधवांना, भगिनींना प्रतिष्ठानतर्फे पुस्तके आणि प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी पाकीटे (व्यक्तिगत स्वरूपात भेट) देऊन सत्कार केला तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. श्रीमती प्रतिभा प्रभाकर मराठे यांनी या वयात स्वतः हाती शिवलेल्या कापडाच्या पिशव्या भेट म्हणून दिल्या. तसेच प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीस देणगी देऊन आर्थिक मदत केली.

दूरवरून, भोपाळहून आपल्या कुलभगिनी श्रीमती निर्मला जनार्दन मराठे यांनी ही मोठ्या हौसेने कार्यक्रमाला हजेरी लावली. कौतुकाची गोष्ट म्हणजे त्यांना त्यांचे चिरंजीव प्रसन्न घेऊन आले होते. त्यांनी अतिशय सुरेल आवाजात श्रीरामरायाचे पद गाऊन दाखवले आणि सर्वांची वाहव्वा मिळवली. त्यांनीही प्रतिष्ठानला आर्थिक देणगी दिली. त्यांनी घरून करून आणलेली रूचकर सुपारी मिष्टान्न भोजनानंतर छान लागली.

गायिका सौ. सुयोग मराठे यांना त्यांच्या चिरंजीव देवांगने पहिल्यांदाच तबल्याची उत्तम साथ केली. हा या कार्यक्रमाचा गोड योग होता. मराठे प्रतिष्ठानच्या व्यासपीठावर चि. देवांग याचा चांगला श्रीगणेशा झाला. हा शुभ संकेत आहे. वयोवृद्धांचे आशीर्वाद त्याला पुढच्या वाटचालीसाठी मिळाले आहेत. श्री. गणेश मराठे, शिरूर यांनीही उत्कंटपणे भाव भक्तीगीते सादर केली. या गुणी कलाकारांना वेळ कमी पडला पुढल्या वेळी ही उणीव भरून काढू. श्री. वा.ग. मराठे यांच्या चिरंजीवाचे पुष्कराजचे भाषणही हृदयाला हात घालणारे होते. अत्यंत मनापासून तो बोलत होता. कृत्रिमतेचा त्याला वासही नव्हता.

❖



सत्कारमूर्ती ~~मराठे~~ ज्येष्ठ मराठे, श्री. माधव वासुदेव (पुणे), श्री. चिंतामण त्र्यंबक (कळवा), सौ. स्मिता चिंतामण (कळवा), श्रीमती प्रतिभा प्रभाकर (अणुशक्तीनगर, मुंबई), श्री. प्रमोद कृष्णा(ठाणे), श्री. सी. गो. खांबेटे (अंधेरी), श्रीमती निर्मला जनार्दन (भोपाळ)



कस्तुरी मराठे स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अर्धपुतळा देऊन वा. गं. चा सत्कार करताना.



'मी मिठाटी बाहुली' सादर करणारी द्वयी : मानसी कुलकर्णी व उदय नेने



कलाकार मराठे : भूषण, देवांग आणि गणेश.

# संवाद कुलबांधवांशी

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९२२०६९९९५७

नमस्कार, कुलबांधव आणि भगिनींनो.

मागील वर्ष संपताना व हे नवीन वर्ष सुरु झाल्यावर खूप उल्लेखनीय घटना देशामध्ये व आपल्या म.प्र. मध्येही घडल्या.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपण आपल्या संस्थेमधे प्रथमच निवडणूकीच्या माध्यमातून संस्थेसाठी विश्वस्त व कार्यकारिणीची निवड केली. तसेच पुणे शाखेच्या व्यवस्थापक मंडळाच्या निवडणुकीसाठी देखील रीतसर अर्ज मागवले मात्र तेथे जरुरीपेक्षा कमी अर्ज आल्याने अर्ज केलेले उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यांचा पुणे येथे २६ जानेवारी २०१७ रोजी झालेल्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी त्यांची सभा घेऊन रीतसर कारभार सुरु केला.

२०१३ पासून आम्ही प्रत्येक गोष्ट काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्याचा सविस्तर आढावा मागील अंकात घेतला आहेच. त्यापुढे जाऊन गेली कित्येक वर्षे न झालेले काम मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी कार्यकारिणी बदलते तेव्हा त्याचा बदलाचा अहवाल तसेच दरवर्षी लेखापरीक्षित ताळेबंद (Audited Accounts) धर्मादाय आयुक्तांकडे द्यायचा असतो. यापैकी कोणतीही कागदपत्रे काही न काही कारणाने दाखल केली गेली नव्हती. १ जाने. २०१७ ते २८ फेब्रु. २०१७ या कालावधीत जुनी सर्व कागदपत्रे दाखल केल्यास कारवाई न करण्याचे संकेत धर्मादाय आयुक्त कार्यालयाने दिले. त्यानुसार त्यासाठी लागणारी कार्यवाही करुन सन २००४ पासूनच्या उपलब्ध असलेले सर्व अहवाल धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन दि. ०७/०२/२०१७ रोजी दाखल केले. त्यासाठी चार-पाच वेळा कार्यालयामध्ये जावे लागले. त्याचबरोबर २०१५-१६ चे लेखापरीक्षित ताळेबंदही दाखल केले. तसेच २००४-०५ ते २०१३-१४ या वर्षाचे लेखापरीक्षित ताळेबंद (Audited Accounts) दि. २२ फेब्रु. २०१७ रोजी दाखल केले. यापुढील संस्थेचे कामकाज सुरळीत व्हावे हाच प्रामाणिक हेतू.

यापुढे जाऊन आपले म.प्र.चे कार्य सर्वदूर पसरावे यासाठी विविध गोष्टी आयोजण्यात येतील व योग्यवेळी आपणापर्यंत पोहोचवल्या जातील. गरज आहे आपल्या सहभागाची. त्यासाठी काय कराल? आपापल्या विभागात, गावात, शहरात जेवढी कुटुंबे आपली मराठ्यांची आहेत त्यांनी एकमेकांच्या संपर्कात राहावे, वेळोवेळी एकत्र यावे, लहान मोठी संमेलने आयोजीत करावीत व त्यावेळी इतरांना बोलवावे. आम्हालाही बोलवावे , आम्ही शक्य तेवढे आवर्जून येऊ.


याचबरोबर आपआपल्या विभागातील गरजू विद्यार्थी विद्यार्थीनी असतील तर आर्थिक परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण अपुरे राहू नये म्हणून आपल्या संस्थेकडून शक्य असेल तितकी मदत कर्ज रुपात शैक्षणिक निधीतून दिली जाईल. अशांना अर्ज पाठवण्यास प्रोत्साहीत करावे. तसेच ज्यांना वैद्यकीय मदत हवी असेल त्यांनाही संस्थेकडे अर्ज करण्यास सांगावे. उपलब्ध फंडातून शक्य ती मदत जरुर केली जाईल. वैद्यकीय विमा घेतल्यास प्रतिष्ठानतर्फे त्याच्या प्रिमियमची रक्कम काही प्रमाणात सभसदांना दिली जाते. या योजनेचाही लाभ घ्यावा. तसेच फंड वाढवणे ही सुद्धा आपली जबाबदारी आहे. ज्यांना शक्य असेल त्यांनी कोणत्या न कोणत्या कारणाने संस्थेला देणगी द्यावी, जेणेकरुन फंड वाढेल व जास्त गरजूंना त्याचा फायदा होईल.

आपण प्रत्येकजण वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असाल. तेथे आपल्या व आपल्या कुटुंबीयांबद्दल घडणारी उल्लेखनीय घटना आवर्जून आम्हाला कळवा म्हणजे हितगुज या आपल्या मुखपत्रामध्ये त्याची दखल घेतली जाईल. आपण लिहिते व्हा व वेगवेगळ्या विषयांवर लिखाण करा व पाठवा योग्य त्या प्रमाणात त्याला प्रसिध्दी दिली जाईल.

आपल्या संस्थेच्या कार्यकारिणीची दर महिन्याला सभा घेतली जाते. अधूनमधून आपल्यापैकी कोणीही कुलबांधव भगिनी यावेळी उपस्थित राहू शकता, आम्हाला आनंदच होईल. आपल्या विभागात सभा व्हावी असे वाटत असेल तर तसेही कळवा म्हणजे सभा ठरवता येईल. आपणा सर्वांचा सहभाग प्रतिष्ठानच्या कार्यात जास्तीत जास्त संख्येने असावा हाच यामागचा मुख्य उद्देश.

आता या महिन्यामध्ये होळी हा पारंपारिक सण व मराठी नववर्ष म्हणजे गुढीपाडवा येत आहे. आपणा सर्वांना होळी व गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा.

आता आपली भेट जूनमध्ये तोपर्यंत बाय बाय... ❖



## हसरे हितगुज

एक मुंबईकर पुण्याला जातो.

**मुंबईकर** : काय हो, तुमच्याकडे आमच्यासारख्या पूर्व-पश्चिम अशा पाट्या का नसतात.

**पुणेकर** : एक तर आमचं दिशाज्ञान चांगलं आहे, आणि दुसरं म्हणजे आम्ही म्हणू तीच पूर्व दिशा असते.

# अभिनयसम्राज्ञी

• डॉ. वि. स. जोग, नागपूर









**दि.** १ एप्रिल १९७२ ची वृत्तपत्रे भारतातील कोट्यावधी घरात एक दुःखद वार्ता सांगत होती. 'मीनाकुमारी मर गई', 'मीना कुमारी इज नो मोअर', 'शोकनायिकेचा शोकांत', 'मीनाकुमारी मोरे गेछे'. मी त्यावेळेस तरुण होतो. भावनाप्रधान होतो. वर्तमानपत्रातल्या मथळ्याच्या अक्षरांची भेसूर भुते नजरेसमोर थयथयाट करू लागली. ही वार्ता खरी आहे? का कोणी एप्रिल फूल बनवलं? पण आकाशवाणी कशी एप्रिल फूल बनवेल? अरेरे. एप्रिल फूलची नियतीने केवढी भयानक थट्टा केली? मीनाकुमारीने नियतीची कशी क्रूर थट्टा केली? वास्तवाने मीनाकुमारीची कशी दारूण वंचना केली?

मीनाकुमारी गेली. तिचा मृत्यू धारदार सुऱ्यासारखा मनात घुसला. आठवणींच्या चिळकांड्या उडाल्या. कुटुंबातील प्रिय व्यक्ती जावी असे हे दुःख तेव्हापर्यंतच्या आयुष्यात दुसऱ्यांदा झाले. प्रथम आचार्य अत्र्यांच्या निधनाने.दुसऱ्यांदा मीनाकुमारीच्या अपमृत्यूने. कारण माझ्या पिढीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्यात तिचे साहाय्य होते.

...मला आठवला अनेक वर्षांपूर्वीचा प्रसंग. बी.ए.ची शेवटची उत्तरपत्रिका देऊन मी आलो आणि कमालीचा उदास झालो. वर्षभर परिश्रम करुनही परीक्षेच्या जुगारातला शेवटला डाव फसल्यासारखे वाटत होते. शेवटली प्रश्नपत्रिका बिघडली होती. अनुत्तीर्णचा निर्णय अगोदरच पाहू लागलो. समोर तलाव, गाडीचा रूळ, झोपेच्या गोळ्या आणि पेटलेला दिवा लागला ...तेवढ्यात एक मित्र घरात शिरला. म्हणाला, ''मीनाकुमारीचा शारदा लागला आहे. मी एकदा पाह्यला आहे. पण आपण पुन्हा पाहू'' मीनाकुमारीच्या जादूने भारुन जाऊन मी मित्रामागोमाग चालू लागलो. सेंट्रल (आजचे गीतांजली) चित्रपटगृह घरापासून दूर होते. दारूडे, कुंटणखाना चालविणारे, स्मगलर, खुनाखुनी करणारे अशा गुन्हेगार लोकांचा अड्डाच ते चित्रपटगृह होते. तरीही आम्ही जात होतो, गेलो. 'शारदा' पाहिला! ...आणि... जीवित साफल्याचा अनुभव मला आला. उत्तीर्ण अनुत्तीर्णतेची फिकीर राहिली नाही. विद्यापीठ पदवीचे प्रमाणपत्र कचऱ्यासारखे वाटू लागले. वाटले, खरोखरच, आपण धन्य आहोत. पदवी म्हणजेच जीवन सर्वस्व नाही. ज्या जीवनाने शारदादेवी मीनाकुमारी पाहिली ते जीवित काय सफल नाही? आणि या अलौकिक अभिनेत्रीचे दर्शन वास्तवातले नाही पडद्यावरचे तर का होईना - पुन्हा पुन्हा घेण्यासाठी आपण जगले पाहिजे ...जगण्यात खरोखरच मौज आहे.

शारदा! हा त्या अभिनय सम्राज्ञीच्या अभिनय कौशल्याचा

सर्वोत्तम आविष्कार! सर्वोत्तम आणि अत्युत्तम या शब्दांनाही जर सुपरलेटिव्ह डिग्री लावली तर जे मराठी शब्द तयार होतील तेच मीनाकुमारीच्या या अभिनय कौशल्याला न्याय देतील. 'शारदा' साकार करणे हे असामान्य अशा अभिनेत्रीच्या दृष्टीनेही एखादी दरी पार करण्यासारखे होते. अभिनयात थोडीही खोट राहिली तर त्या दरीत अभिनय जीवनाचा चक्काचूर! पण मीनाकुमारी ही असामान्यातील असामान्य होती. जेवढी दरी मोठी तेवढी तीची उडीही मोठी! ...'जप जप जप जप जप रे' या गीताच्या वेळच्या राजकपूरच्या प्रणय चेष्टांना केवळ सुखद स्मितातून दाद देणारी 'शारदा'! 'ओ चांद जहाँ वो जाये' या स्वर्गीय गीताला न्याय देत आपल्या प्रियकराची उत्कंठेने वाट पाहाणारी 'शारदा'! एकेकाळच्या आपल्या प्रियकराला त्याची सावत्र आई या नात्याने प्रथमच भेटताना भगवद्गीतेच्या आश्रयाने स्वतःला सावरणारी शारदादेवी! 'वेट अंटील डार्क' मधील आंधळ्या मुलीची भूमिका वाट्यास आलेली आँड्रे हेपबर्न सोडली तर जगातील कोणत्याही अभिनेत्रीने 'शारदा' साकार करण्याइतके कठीण आव्हान स्वीकारले नाही. त्यांना ते पेलवलेही नसते.

वयाच्या चौथ्या वर्षी 'लेदर फेस'च्या रजतपटावर आलेल्या आणि वयाच्या चाळीसाव्या वर्षी 'पाकीजा' च्या अवतारानंतर आपल्या रजतपटीयच नव्हे तर वास्तविक जीवनाचीही समाप्ती करणाऱ्या या 'मेहजबीन'ने आपल्या पडद्यावरील आणि पडद्यामागील जीवनात जी विविध आव्हाने स्वीकारली, जिंकली आणि दिली त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात तोड नाही. या आव्हानांशी झुंजताना तिचे व्यक्तित्त्व, शरीर आणि मन अनेकदा रक्तबंबाळ झाले. परंतु मृत्यूशिवाय ते कोणालाही शरण गेले नाही. खरे म्हटले तर मृत्यूलाही शरण गेले नाही. तिला कोणीतरी एकदा विचारले, 'हे आयुष्य पुन्हा एकदा आपल्या इच्छेनुसार जगण्याची संधी तुला मिळाली, तर तू काय करशील?' ताडकन मीनाकुमारी उतरली, 'तो मै फिर एक बार बिलकुल इसी तरह जीना चाहुंगी'.

आपल्या चौतीस वर्षांच्या रजतपटीय आयुष्यात अभिनय सम्राट अशोककुमार पासून 'दुश्मन' राजेश खन्नापर्यंत कितीतरी अभिनेत्यांशी जुगलबंदी तिला खेळावी लागली. कधी कधी तर या सामन्याचे स्वरूप दोन किंवा तीन विरुद्ध एक होते. वहिदा रहमान, मीनाकुमारी, अशोककुमार. चित्रपट, साहिब, बीबी और गुलाम! सुनील दत्त, मीनाकुमारी, अशोककुमार चित्रपट, एकही रास्ता, परंतु मीनाकुमारी कोठेही कधी उणी पडली नाही. हे फक्त मीनाकुमारीच्या बाबतीतच घडले आहे.

अशोककुमार बरोबरचा 'परिणीता' हा मीनाकुमारीचा एक भावूक बंगाली चित्रपट होता. ते वैशिष्ट्यपूर्ण अबोल बंगाली प्रेम मीनाकुमारीने केवळ मुद्राभिनयाने व्यक्त केले. त्या चित्रपटातील एक प्रसंग– नायकाच्या घराखालीच राहाणारी ही अल्लड कुमारी एकदा पाठमोऱ्या बसलेल्या नायकाच्या गळ्यात एकदम फुलांची माला टाकते. केवळ गंमत म्हणून! नायक मनोमन तिच्यावर प्रेम करीत असतो. तिला थांबवून त्या फुलमालेचे पवित्र विवाहमालेत रूपांतर करतो. नायिका भांबावते, आनंदते आणि भारावते. या तीन भावना तीन मिनिटांच्या अवधीत मीनाकुमारीच्या मुद्रेवर उमटतात. तीन तासाच्या चित्रपटातील तीन मिनिटात ती आपल्या अभिनयाचे अलौकिकत्व सिद्ध करते. शरद बाबूंची ललिता २००६ मध्ये विद्या बालनने पुन्हा पडद्यावर आणली. तीही चांगली अभिनेत्री आहे. पण मीनाकुमारीचे मौन सामर्थ्य आणि संवाद सामर्थ्य दोन्ही अमर आहेत. दुसरा प्रसंग दोन मिनिटांचा आहे. चित्रपट बलदेवप्रसाद चोप्रांचा 'एक ही रास्ता'. नायक पुन्हा अशोककुमार! नायिका मीनाकुमारी विधवा असते. तिच्या पतीचा मित्र (अशोककुमार) तिच्यावर प्रेम करीत असतो. त्याच्या सद्गुणांनी भारावलेली ही विधवा पुनर्विवाहाचा विचार मानसिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर करीत असते. परंतु सनातन समाजाने चालविलेला संघर्ष त्याहीपेक्षा मोठा असतो. एकदा तिच्या घरी येत असताना नायकाला लोक मारतात. तिच्या दारापाशी पोहोचला असताना त्याच्या मस्तकावरून रक्ताचे ओघळ येत असतात, नायिका दार उघडते. दरवाज्यात रक्तबंबाळ नायक, दरवाज्यासमोर लोकांची गर्दी. काठ्या उगारलेली. गलिच्छ शिव्या देत असलेली. अशा वेळी नायक एकदम त्या गर्दीच्या साक्षीने आपल्या कपाळावरील रक्ताने विधवा नायिकेच्या पांढऱ्या फटफटीत कपाळावर तिलक लावतो. आकस्मिक घटनेने विधवेचे दुःख संपलेले असते. मनातला संघर्ष संपलेला असतो. कृतज्ञतेची भावना तिचे मन ओसंडून वाहात असते आणि रूढींशी संघर्ष देणारे धैर्य तिच्या ठिकाणी निर्माण झालेले असते. हा सगळा भावभावनांचा आविष्कार मीनाकुमारी केवळ मुद्रेने घडविते. केवळ डोळ्यातून दाखविते. म्हणून सत्यजित रे म्हणतात, 'मीनाकुमारी अत्युच्च कोटीची अभिनेत्री होती.'

ती अजोड कलावंत होती. अव्वल कलावंतांना भूमिकेचे वावडे नसते. ना दुसऱ्या भूमिका करणाऱ्या नटनट्यांचे. ना त्याच नटांबरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका करायचे. ज्या अशोककुमार बरोबर प्रेयसीची आणि पत्नीची भूमिका तिने केली त्याच अशोककुमारला खलनायक म्हणून सफल करण्यातही तिचा वाटा मोठा होता. वर्षानुवर्षे ज्या नटांबरोबर प्रेमाच्या आदराच्या भावना आविष्कृत केल्या जात होत्या, त्याच नटाविषयी निखालस शत्रुत्वाच्या भावना साकार करणे

नाही म्हटले तरी कठीण. मनाची तशी तयारी करणे कठीण. 'आरती'मध्ये तर संतापाने थरथरून अशोककुमारच्या थोबाडीत मारण्याचा प्रसंग. परंतु या अभिनय सम्राज्ञीने तेही दिव्य वठवले. केवळ याच एका नव्हे तर 'भिगी रात', 'चित्रलेखा' आणि 'जवाब'मध्येही.

'चित्रलेखा' हा तिच्या अभिनयकौशल्याचा आणखी एक आसामान्य अविष्कार. त्यात तिला अशोककुमारशी सामना तर करावयाचा होताच. परंतु 'वैशाली की नगरवधू' लिहिणाऱ्या वृंदावनलाल वर्मा या महान साहित्यिकाचे स्वप्न साकार करावयाचे होते. दिग्दर्शक केदार शर्मांना समर्पक साथ द्यायची होती. साहीर लुधियानवीच्या तत्वज्ञानाला अमर करावयाचे होते. संगीतकार रोशन यांच्या संगीताला पेलावयाचे होते. केवढे आव्हान? ती ते सर्व करू शकली. मी विचार करतो तेव्हा 'संसार से भागे फिरते हो, भगवान को क्या तुम पाओगे... ये पाप है क्या पुण्य है क्या रीतो पे धर्म की मुहरे है' या साहीरच्या तडाखेबंद तत्वज्ञानाला परिणामकारक रीतीने आविष्कृत करण्यासाठी मीनाकुमारीशिवाय दुसऱ्या कोणाचा चेहरा मुळी समोरच येत नाही. योगी कुमार गिरी म्हणजे अशोककुमारला साहीरच्या या गीताच्या शब्दाशब्दातून उत्तर देण्याची अंतिम मर्यादा तिने गाठली. त्या वेळेसची तिची चाल, आव्हानात्मक मुद्रा, विजयी डोळे केवळ अद्वितीय. त्या चित्रपटात एक गझल आहे. 'इस जीवन की चलती चक्की रूप को किसने बांधा। रंग पे कितने पेहरे डाले...

एक प्रसंग आहे. स्वतःच्या सौंदर्याचा गर्व असणाऱ्या चित्रलेखेला एकदा वेषभूषा करीत असताना पांढरा केस आढळतो.

ती चमकते. म्हाताऱ्या भविष्याने थरकापते. रूपाची नशा खाडकन उतरते... रंगपे किसने पेहेरे डाले रूप को किसने बांधा- आणि हा थरकाप, हे काळीज धास्तावणे, ही रुपनशा उतरणे - भावभावनांचे किती विविध प्रकार. परंतु मुद्रा एकच ..मीनाकुमारी! खरोखर 'चित्रलेखा' मीनाकुमारी अमर आहे. साहीरच्या काव्य तत्वज्ञानावरही मात करणारी मीना अमर आहे.

ती शोकनायिका होती. परंतु शोकाचा तो साचेबंद आविष्कार नव्हता. त्यातही विविधता होती. वैशिष्ट्यपूर्णता होती. 'साहिब बीबी और गुलाम' मधली छोटी बहूदेखील अशीच अविस्मरणीय वैशिष्ट्यपूर्ण होती. पतिप्रेमासाठी मद्याचे प्याले पचविणारी ही हिंदू पतिव्रता या मेहजबीनने अजोड कौशल्याने उभी करावी हाच मुळी नियतीचा किती विचित्र संकेत होता. ही भूमिका स्वतः मीनालाही कठीण वाटत होती. तिच्यादृष्टीने 'हिंदुस्थानी नही मालूम होते हुए भी हिंदुस्थानी' अशी ही भूमिका होती. मद्याच्या धुंदीतील एक गाणे... न जाओ सैय्या, छुडाके बैय्या, कसम तुम्हारी मै रो पडूंगी! या गाण्याच्या अभिनयात पतिसाठी दारू पिणे आहे. पिऊन झिंगणे आहे. या झिंगण्याचीही लाज आहे. पतिसाठी एवढे बलिदान करूनही पतिसंयोगाचे यश न मिळाल्यामुळे आलेले वैफल्य आहे. वैफल्यालाही मूर्तरूप देणारी मीनाकुमारी ही जीवनाचे साफल्य करणारी एकमेवाद्वितीय अभिनेत्री आहे. तिच्या या लौकिक आणि अलौकिक वैफल्यावर भाष्य करताना ख्वाजा अहमद अब्बास लिहितात, 'मीना मद्याची मैत्रीण होती. जीवनाची अर्थशून्यता, जीवन जगताना निरुपायाने स्विकाराव्या लागणाऱ्या गोष्टी, जीवनातले एकटेपण या साऱ्या गोष्टींमुळे ती मद्याच्या अधीन झाली. कवीचे, कलावंताचे अंतः करण काचेपेक्षाही नाजूक असते. या काचेच्या अंतःकरणाशी जेव्हा दारूच्या बाटलीशी टक्कर होते तेव्हा बाटली फुटत नाही अंतःकरणाचे मात्र तुकडे-तुकडे होतात.'

वास्तविक जीवनात मीनाकुमारी वांझ होती. परंतु रूपेरी पडद्यावरील ती बहुप्रसवा अभिनेत्री होती. तिच्या मृत्यूने कितीतरी भावभावना पोरक्या झाल्या. तिने कारूण्याला अनाथ केले. वात्सल्याला अनाथ केले. पावित्र्याला अनाथ केले. सोशिकतेला अनाथ केले. निरागसतेला अनाथ केले. आणि 'सुनिये!' या आपल्या लाडक्या शब्दालाही अनाथ केले. बस्स्! कव्हर ड्राइव्ह पाहावा विजय हजारेचा नी 'सुनिये!' शब्द ऐकावा मीनाकुमारीचाच! एरवी तीन अक्षरांची बेरीज असणारा हा सामान्य शब्द मीनाकुमारीच्या तोंडून बाहेर पडला म्हणजे विलक्षण सामर्थ्याचा गुणाकार होई. या शब्दात रागावलेल्या प्रियकराला शांतवण्याचे सामर्थ्य होते. बेपर्वा आणि बेताल पतीला थोडा वेळ का होईना काबूत ठेवण्याचे सामर्थ्य होते. दुष्ट खलनायकाला जरबेत ठेवण्याइतका वचक होता. अवखळ दिराला किंवा उड्डाणटप्पू मुलाला सांभाळण्याचे सामर्थ्य या शब्दात होते. 'परिणीता' पासून 'पाकिजा'पर्यंत कितीतरी चित्रपट मीनाकुमारीच्या या 'सुनिये'ने अनेक प्रसंगात तेजाळले आहेत. 'पाकिजा'मधला एक प्रसंग. नियती तिला राजकुमारच्या तंबूत आणते. एकमेकांच्या न कळत एकमेकांना एकमेकांची ओळख पटली असते. एकदा घोड्यावर बसलेला राजकुमार तंबूबाहेर थोडा वेळ थांबून बाहेरूनच तिला आपण बाहेर जात असल्याचा निर्देश करतो. मीनाकुमारी त्याच्या विरहाने, अस्वस्थ होते. घाबरते. व्याकूळ होते. अनेक भावभावनांचा कल्लोळ तिच्या अंतःकरणात झालेला असतो. परंतु तिच्या तोंडून प्रथम एकच शब्द बाहेर पडतो, 'सुनिये' नंतर ती एक अख्खे, तोडके वाक्य म्हणते. परंतु हा 'सुनिये' शब्दच राजकुमारला सुखवून जातो आणि भावविव्हल प्रेक्षकांनाही!

राजकुमारची आठवण झाली म्हणजे 'दिल एक मंदिर'ची

आठवण होते. 'दिल एक मंदिर'ची आठवण झाली म्हणजे पुन्हा पाणावलेल्या डोळ्यांसमोर मीनाकुमारी उभी राहाते. त्या वेळेस तिचा दोन जबरदस्त अभिनेत्यांशी सामना होता. कारण त्या काळात राजेंद्रकुमार अभिनयाच्या दृष्टीनेही जोरावर होता. एक जण प्रत्यक्ष पती तर एक जण लग्नापूर्वीचा प्रियकर. प्रियकर कर्करोगाचा रोगी तर पती त्याच्यावर उपचार करणारा डॉक्टर. तशात एकजण आपणास फसविल्याबद्दल रागावलेला तर दुसरा गैरसमजाने पछाडलेला. या कात्रीत सापडलेली 'सीता' मीनाकुमारी. क्षणाक्षणाला संघर्ष. पुन्हा सुखी राहाण्याचा प्रयत्न. खरोखर दिल जर एक मंदिर असेल तर मीनाकुमारी हीच एक देवता त्या मंदिरात अधिष्ठित होण्यास लायक आहे.

राजकुमार बरोबर तिने 'दिल अपना प्रीत पराई', 'काजल', 'अर्धांगिनी' आदी चित्रपटात भूमिका केल्या. खरंतर तिला 'दिल अपना प्रीत पराई' या चित्रपटासाठी 'फिल्म फेअर' पारितोषिक मिळायला हवे होते. नाही मिळाले. 'काजल'साठी मिळाले. याशिवाय परिणीता, बैजू बावरा, शारदा, साहीब बिबी और गुलाम या चित्रपटांसाठीही मिळाले. 'दिल अपना प्रित पराई'मध्ये तिने परिचारिका करूणा साकारली. परिचारिका मोठ्या रुग्णालयांच्या व्हरांड्यातून सामोऱ्या आणि पाठमोऱ्या कशा चालतात हे तिने हुबेहूब दाखवले. 'अजीब दास्तां है ये कहाँ शुरू कहा खतम' या गाण्याच्या वेळेत तिचा अभिनय पाहून लतादीदी म्हणाल्या होत्या, 'माझ्या शेकडो गीतांवर अनेक अभिनेत्रींचे अभिनय मी पाहिले. पण या गीताच्या वेळचा मीनाकुमारीचा अभिनय हा स्वरांचा अभिनयाने केलेला सत्कार आहे' मीनाच्या 'बैजू बावरा' मधील 'तू गंगा की मौज मै' या गीताच्या वेळचा अभिनय हा तर संगीत सम्राट नौशाद आणि स्वरसम्राट महंमद रफी अशा दोघांचाही पराभव करणारा आहे.

मोठ्या विषयाशी झुंज घेतली की माणसाचे व्यक्तिमत्त्व मोठे होते असे म्हणतात. मीनाकुमारीने घेतलेल्या अशा अनेक यशस्वी झुंजीपैकी एक झुंज म्हणजे 'भाभी की चुडिया'मधील तिची भूमिका. मराठीतील श्रेष्ठ कथाकार य.गो. जोशी यांची 'वहिनींच्या बांगड्या' ही एक सर्वश्रेष्ठ कथा. तशात मराठीत सुलोचनाबाईंनी ही वहिनी अभिनयाच्या गौरीशंकरावर नेऊन पोहोचविली. त्यामुळे तेवढ्या उंचीवर 'भाभी'ला पोहोचविण्याचे कठीण काम मीनाकुमारीवर येऊन पडले. नेहमी असे घडले आहे की मराठीतले चित्रपट हिंदीत आले तर तेवढी उंची– दिग्दर्शन आणि अभिनय कौशल्य या संदर्भात –ते कधीच गाठू शकत नाही. 'भाभी की चुडिया' आणि त्यातही मीनाकुमारीचा अभिनय हा त्याला अपवाद होता. बालपणीच मातृप्रेमाला पोरका झालेला दीर 'तुमसे ही घर घर कहलाया' असे ज्या वहिनीबद्दल म्हणू शकतो ती 'भाभी' मीनाकुमारीने अद्वितीय सामर्थ्याने उभी केली. अगदी गणिती पद्धतीने तुलना करावयाची झाली तरी मीनाकुमारीचा प्रत्येक 'शॉट' हा सुलोचनाबाईंच्या 'शॉट' इतकाच काळीज हेलावणारा आणि डोळे पाणावणारा होता.

एका प्रसंगात तर मीनाकुमारीने सुलोचनेवर ताण केली. शाळकरी दीर आपल्या वहिनींना पाह्यला येतो. त्याची पसंती ही अंतिम असते. त्या वेळेस त्याला दाखविण्याकरिता भारतीय संस्कृतीने लाजलेली 'वहिनी' येते. आपला पडदा दूर करून त्याच्याकडे पाहाते मात्र आणि त्या डोळ्यात विश्वातले सगळे वात्सल्य, सगळे प्रेम साठविले जाते. मीनाकुमारीचे ते केवळ डोळे 'सुलोचने'च्या अभिनयावर मात करतात, दिराची पसंती होते. पुन्हा एकदा भावनाप्रधान प्रेक्षकांचे जीवनसाफल्य होते.

निर्माता दिग्दर्शक श्री ख्वाजा अहमद अब्बास यांच्या 'चार दिल चार राहे' या प्रचारकी व अनुबोधपट सदृश चित्रपटात मीनाकुमारीची एक छोटीशी भूमिका होती. चित्रपटातले तिचे नाव चावली. चावली एक चांभारकन्या. गोविंदा हा अहिरपुत्र तिच्यावर प्रेम करतो. चावली 'कालीकु' असते. गोविंदाबरोबर (राजकपूर) तिची एक दोन दृश्यात निसटती प्रणयलीला आहे. म्हणजे त्याठिकाणी तिला वाव नाही. एक ठेकेदार तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न करतो. चावली प्रतिकार करते. ठेकेदाराच्या कपाळावर जबर जखम करते. बेशुद्धावस्थेतला ठेकेदार तिला मृत वाटतो. त्यावेळची भयकंपित अवस्था मीनाने सरस साकारली. मात्र चित्रपटात मीनाच्या तोंडी समाजवादाचा पोपटी नारा आणि हाती कुऱ्हाड हे हास्यास्पद वाटते. तशी 'चावली'ची व्यक्तिरेखा अत्यंत उथळ आणि ढोबळ आहे. त्या उथळ व्यक्तिरेखेतला एकच भावाविष्कार मीनाकुमारीसारख्या अभिनयसम्राज्ञीला शोभेसा लेखकाने लिहिला. गोविंदा चावलीशी लग्न ठरवतो. तो सांगतो, 'तू ज्यावेळेस ढोल बडवण्याचा आवाज येईल त्यावेळेस गावाबाहेरच्या मंदिरात ये.' आवाज येतो. चावली सजूनधजून जायला निघते. तेवढ्यात गावातले जातीयवादी गुंड चावलीचे घर जाळतात. चावली निसटून जाते. पण श्रेष्ठ अभिनयाचा पुरावा असलेला प्रसंग हा नाही. पुढे चित्रपटाच्या शेवटी शेवटी रूपेरी पडद्यावर चावली दिग्दर्शक महाशयाच्या कृपेने अवतरते. एकदा रोजंदारीवरचे काम संपवून चावली रात्री परतते त्या वेळेस गावात होळीसणासाठी ढोलनाद सुरू असतात. त्यावेळेस चावलीला एकदम जुनी आठवण येते. त्यावेळेस प्रत्यक्षात तिला जायचे असते समूहनृत्यात सहभागी होण्यासाठी, पण तिच्या डोळ्यासमोर असते नववधू आणि मग वेषभूषा, केशभूषा आणि अलंकार भूषा करताना प्रत्येक कृतीमध्ये मीनाने मीलनोत्सुक नववधू जी साकार केली आहे तिला तोड नाही. त्या वेळेस

उत्स्फूर्तपणे उद्‌गार निघतात, 'केवळ मीनाच हे करू शकते'!

माझ्या आठवणीतील तिच्या शेवटल्या दोन जबरदस्त 'झुंजी' म्हणजे 'दुष्मन' आणि 'मेरे अपने'मधील तिच्या भूमिका. गाठ अनुक्रमे जबरदस्त समजल्या जाणाऱ्या राजेश खन्ना व खरोखरच जबरदस्त असलेल्या शत्रुघ्न सिन्हा या अभिनेत्याबरोबर होती. राजेश खन्नाभोवती लोकप्रियतेचे आणि प्रसिद्धीचे वलय होते. मीनाकुमारीची लोकप्रियता, प्रसिद्धी आणि प्रकृतीही ओसरणीस लागली होती. भूमिका आली होती काहीशी प्रेक्षकांची नाराजी ओढवून घेणारी दांशिक मनाच्या दुखावलेल्या विधवेची. जी अपघाताने का होईना आपल्या पतीच्या मृत्यूस कारण असलेल्या ड्रायव्हरचा सातत्याने द्वेष करते. त्या विधवेविषयी त्वेष वाटावा, चीड यावी इतकी ती भूमिका सफल झाली. या उलट त्या विधवेची अशी मनोवृत्ती का झाली याची कारणमीमांसा केवळ मुद्रेवर उठवून मीनाकुमारीने व्यक्तिरेखेला न्याय दिला, 'मेरे अपने'ला तर वृद्धेच्या मेकअपनेसुद्धा साथ दिली. भाबडी आनंदी माँ प्रेक्षकांच्या मनावर अवीट ठसा उमटवून गेली.

आपल्या अपूर्व अभिनय कौशल्याचा आविष्कार घडवून अनेकांच्या जन्मजन्मांतरीचे साफल्य मीनाकुमारीने अनेकदा केले. बैजूची बावरी मीना हे लुब्धतेचे मानवी रूप होते. 'मिस मेरी' मीना ही अवखळतेचा मजेदार आविष्कार होता. किशोर कुमारच्या 'शरारती'ने त्रासून गेलेली मीना कोणाच्या स्मरणात राहाणार नाही? 'अजीब दास्ता है यै, कहां शुरू कहां खतम' हे गीत व्याकुळतेने गाणारी 'दिल अपना प्रित पराई'मधील परिचारिका मीना नर्स व्यवसायाचा आदर्श शतपटीने वाढविणारी होती. 'फुल और पत्थर', 'चिराग कहां रोशनी कहां', 'किनारे किनारे', 'चार दिल चार राहे', 'दायरा' हे केवळ मीनाकुमारीसाठी पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या चित्रपटगृहात दाखविले जात असताना त्या चित्रपटगृहापुढे होणारी गर्दी हा वृत्तपत्रांच्या वार्तांचा विषय होता. अर्धांगिनी चित्रपटात अपशकुनी मानल्या गेलेल्या विवाहितेची भूमिका तिने केली. त्यावेळेस सारखी नाराज होणारी सासू एकदा तिच्यावर प्रसन्न होते. तो आनंद ती नवऱ्याला ज्या उत्कंठतेने सांगते त्या अभिनयाला तोड नाही.

अभिनय सम्राज्ञी मीनाकुमारी मानवी शब्दांनी सजू शकत नाही. एक ऑड्रे हेपबर्न सोडली तर जागतिक चित्रसृष्टीत या अभिनय सम्राज्ञीच्या अभिनयाला तोड नाही. तिच्या अभिनयाची पूजा बांधायला शब्द नाहीत. नर्गीससाठी वापरल्या गेलेल्या प्रसिद्धीतंत्राचा एक सहस्त्रांशही मीनासाठी वापरला गेला नाही. तरीही मीनाचा अभिनयाविष्कार नर्गीसपेक्षा सहस्रपटीनी श्रेष्ठ होता. तिच्या अभिनयाबद्दल कथ्थक सम्राज्ञी सीतारादेवी म्हणते, 'पाकिजाच्या नायिकेची भूमिका नृत्यप्रधान होती. मीनाकुमारी जवळ नृत्यकलेचा पूर्ण अभाव होता. तरीदेखील पाकीजामधल्या आपल्या भूमिकेत मीनाकुमारीने हा अभाव कुठेही खटकू दिला नाही.'

१९३६ मध्ये वयाच्या चवथ्या वर्षी मीना चित्रपटात आली. १९४५ मध्ये 'बच्चोंके खेल' या चित्रपटात तिला नायिकेचे काम मिळाले. १९५३ पर्यंत मीना चित्रक्षेत्रात असहनीय उमेदवारी करीत होती. १९५३ मध्ये 'बैजू बावरा' प्रदर्शित झाला. १९७२ मध्ये 'पाकिजा' म्हणजे सतत १९ वर्षे ही अभिनयसम्राज्ञी रजपतपटावरील सम्राज्ञीचे जीवन जगली.

नर्गीसच्या तुलनेत मीनाकुमारी श्रेष्ठ होती. नर्गीसला आवाज नव्हता तो मीनाला होता. नर्गीस अभारतीय व्यक्तित्त्वाची. उलट मीनाकुमारी ही सर्वथैव भारतीय व्यक्तिमत्त्वाची, इतकी की ती मुसलमान असली तरी मुस्लीम पेहेरावात परकीयच वाटे. प्रेक्षकांचे डोळे तिला सनातन हिंदू पेहेरावाशिवाय कोणत्याही पेहेरावात बघायला तयार नव्हते. मीनाच्या नायिकांनी काळाचे प्रतिनिधित्व केले. काळासमोर अनेक आदर्शही निर्माण केले. नर्गीस भारतीय चित्ररसिकांच्या दिवाणखान्यापर्यंतच थांबली. मीनाकुमारी मात्र देवघरापर्यंत शिरली. राजकपूरने नर्गीसचे सेक्स-एक्सप्लॉयटेशन केले. मीनाकुमारीला अशा पद्धतीने पडद्यावर दाखविणे कोणी स्वप्नातही आणले नसेल.

मानवी जीवनातल्या सर्व भावभावना अभिनित करण्यात मीना अजोड होती. अभिनयाची सर्व आव्हाने तिने स्वीकारली. ती शोकनायिका होती. पण सुखदायिनीही होती. संवादफेकीत मीनाकुमारी अजोड होती. तिचे संवाद श्रोत्याच्या काळजाला हात घालीत. कारण संवाद लेखकाच्या आत्म्याशी ती समरस व्हायची. तिचे डोळे कारूण्याचे गुलाम होते. वात्सल्याचे मित्र होते. निर्मळतेचे धनी होते. या डोळ्यांनी ग्लीसरीनचा उपयोग कधी केला नाही. तिचे शरीर परमेश्वराने आपल्या हाताने बनविले होते. रंगभूषेशिवायही मीनाचे दर्शन ज्यांनी घेतले त्यांना वाटायचे शुद्ध चांदी लक्षलक्ष तेजानं झळकतेय. तिचे मन मात्र मानवी जगाने घडविले होते. मीनाकुमारीच्या असामान्यतेचा एक पुरावा म्हणजे अशोककुमारपासून राजेश खन्नापर्यंत विविध काळातील विविध कुवतीच्या अभिनेत्यांपर्यंत काम करूनही ती अजेयच राहिली. म्हणजे असे की, (अशोकचा अपवाद वगळता) या अभिनेत्यांशी एकतर ती तुल्यबल राहिली किंवा वरचढ ठरली. 'बादबान' आदी चित्रपटात तिनं काम केलं. तो देखणा नायक अभिनयाच्या कमाल उंचीबद्दल प्रसिद्ध नव्हता. पण अभिनयाची त्याची जाण चांगली होती. त्याने कबुली दिली, 'मीनाकुमारी आम्हा सगळ्यांपेक्षा श्रेष्ठ होती. तिच्या ऐतिहासिक कर्तृत्वाची बूज राखली नाही ही खेदाची गोष्ट आहे'.

अभिनय सम्राट अशोककुमारविषयी मीना म्हणायची 'ते जोडीच्या कोणाही कलावंतावर आपली मते लादत नाहीत. पण कोणाला वाऱ्यावरही सोडत नाहीत. मला नेहमी ते मित्रत्वाच्या भावनेने वागवत, सहकार्य देत. जेव्हा माझ्या हातून चुका होत तेव्हा ते तर 'हे दृश्य अशा पद्धतीने अभिनित केले तर अधिक जिवंत होईल' असे तुला नाही वाटत मीना?' असे विनम्रपणे सूचवित.

अभिनयात मी जे काही शिकले ते अशोककुमार यांच्यापासून. चेहऱ्याचा, डोळ्याचा अभिनयातला सहभाग त्यांनीच मला शिकविला. संवाद म्हणताना मधूनच कसे थांबायचे हे त्यांनी मला सांगितले. अभिनयाचे व्याकरणच मुळी त्यांनी माझ्याकडून करवून घेतले.'

मीनाकुमारीने एकूण एक्याण्णव चित्रपटात भूमिका केल्या. यापैकी सर्वाधिक म्हणजे चौदा चित्रपटात तिच्याबरोबर अशोककुमार मुख्य अभिनेता होता. सात चित्रपटात तिने धर्मेंद्रबरोबर काम केले. 'फिल्मफेअर' स्पर्धात तिने परिणीता, बैजू बावरा, शारदा आणि साहिब बीबी और गुलाम या चार चित्रपटातील भूमिकांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक पटकाविले. हा एक विक्रम आहे. १९६२ मध्ये निवडीच्या अंतिम फेरीत फिल्मफेअरच्या चित्रपट परीक्षण मंडळासमोर आलेले तीनही चित्रपट आरती, साहिब बीबी और गुलाम व दिल अपना प्रित पराई हे तिचेच होते.

याचं कारण मीना ही मीना आहे; तिच्या बरोबर काम करण्यात एक विशेष सुख आहे असं थोर कलावंतांना वाटायचं. भूमिकेच्या अंतरंगात शिरून तिचे सर्व पैलू पडद्यावर सादर करण्याची क्षमता तिच्या ठिकाणी होती. क्षमतेबरोबर नवीन काही शिकण्याचीही तिची वृत्ती होती.

'अभिनयात आवाजाला अतिशय महत्त्व आहे. माझ्या निसर्गदत्त आवाजाचा उपयोग कसा करावा म्हणजे अभिनय उजळून निघेल हे मला राजकपूर यांनी शिकवले.' असे ती म्हणते. पुढे सांगते,

'शारदाच्या चित्रीकरणाच्या वेळेस मला जाणवले माझ्या आवाजात काही गडबड आहे. त्यावेळेस मी आणि राजकपूर ध्वनिपट्टीका घेऊन बसायचो. वेगवेगळे आवाज ध्वनिमुद्रित व्हायचे. राज मला सांगायचे आवाजाची कोणती फेक उत्तम आहे.'

'मीनाकुमारीचा चेहरा कमालीचा संवेदनाक्षम, विलक्षण बोलका, पण तो ताजा टवटवीत असताना तिच्या चित्रपटाचे छायालेखन करण्याची संधी मला मिळाली नाही याची खंत आहेच.' असे सुप्रसिद्ध छायालेखक श्री. जयवंत पाठारे सांगतात. पुढे असेही म्हणतात,

'मझली दीदी' व 'श्याम सवेरा' या तिच्या प्रमुख भूमिका असलेल्या दोनच चित्रपटांचा मी छायालेखक. अर्थात हे दोन्ही चित्रपट हृषिदांनीच दिग्दर्शित केलेले हे वेगळे सांगायला नकोच.

मीनाकुनारीचा चेहरा संवेदनाक्षम असला तरी, काहीसा जड होता. भावनांचा कल्लोळ, सूक्ष्म भाव प्रकट करण्यासाठी ती आपल्या ओठांचा फारच छान उपयोग करी. त्यामुळे तिचे हे सूक्ष्म भाव टिपण्यासाठी मला कॅमेऱ्यातून कमालीची काळजी घ्यावी लागे. धडपड करावी लागे.

'मझली दीदी'तला हा प्रसंग. त्यावेळी बालनट असलेल्या सचिनच्या गालावर मारायचे होते. बालके हा मीनाकुमारीचा विशेष विक पॉईंट. बालकांवर तिचे मनस्वी प्रेम! म्हणूनच सचिनवर तिची माया जडलेली. त्याला कॅमेऱ्यापुढे गालावर मारणे तिच्या जीवावर आले. ती हृषिदांना कळवळून म्हणाली ''मी याला रागावते एवढ्यावरच भागवा'' पण हृषिदा तयार होईनात. तेव्हा तिनं अट घातली, एकच शॉट देईन रीटेक देणार नाही. शॉटमध्ये तिने मन घट्ट करून सचिनच्या गालावर मारले. शॉट ओ.के. झाला. नंतर ती सचिनला हृदयाशी कवटाळून बराच वेळ रडत बसली. ते पाहून आम्हा सर्वांचे काळीज गलबलून आले होते.

मीनाकुमारीच्या अभिनयाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचा पेहराव बोलत नसे तर भूमिकेत शिरताना त्याचा तिच्या सर्वांगावर परिणाम दिसत असे. छाती, हात, पाय असे सर्वांग अभिनय प्रकट करीत असे. रागावलेली असली की साऱ्या शरीराला कंप सुरू झालेला दिसे.

'श्यामसवेरा'चं शेवटचं शूटिंग होतं. कॅमेऱ्यापुढे संवाद बोलता बोलता मीनाकुमारीचा आवाज जड झाला कंठ दाटून आला. डोळ्यातून पाणी वाहू लागले. आम्ही हे पाहून घाबरलो. काय झाले हे समजेना पण मीनाकुमारीने कसाबसा शॉट दिला. मी झटपट त्यांच्यापुढे जाऊन विचारले ''मीनाजी काय झालंय तब्बेत ठीक नाही काय? पण मीनाकुमारीनं उत्तर दिले नाही. स्फुंदून स्फुंदून रडत राहिली.

मग हृषिदांनी हळूवारपणे, पण खोदून खोदून विचारल्यानंतर त्या म्हणाल्या 'हृषिदा हे आजचं शेवटचं शूटिंग. पुन्हा केव्हा भेटू. सांगता येणार नाही. त्यामुळेच मला गलबलून आलं. भावनांना आवरणं कठीण झालं. बाकी काही नाही.'

'खरेच त्यानंतर मीनाकुमारीची पुन्हा कॅमेऱ्यापुढे भेट झालीच नाही'... एका अभिनयसम्राज्ञीचा अस्त झाला.

*अभिनयसम्राज्ञी मीनाकुमारी – लेखक डॉ. विजय सखाराम जोग, नागपूर, लाखे प्रकाशन, नागपूर. सौ. शैलजा जोग, द्वितीय आवृत्ती १४ जाने. २००९ या पुस्तकावरून साभार.* ❖

# विजयी डॉ. विजया वाड

• श्यामला पुरंदरे-जाईल, (पृ. ७५५), पुणे भ्रमणध्वनी - ९४०५८४५९८४



आज सकाळी पुढील आनंददायी बातमी वाचली. साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे देण्यात येणारा 'मालतीबाई दांडेकर गौरव पुरस्कार' डॉ. विजया वाड यांना जाहिर झाला आहे. नजरेसमोर तिचं पवई येथील उबदार घरकूल उभं राहिलं, जिथे असेच अगणित पुरस्कार डॉ. वाड पतीपत्नीप्रमाणे सर्वांच मनःपूर्वक हसून स्वागत करतात. आम्ही दोघी पनवेलच्या बालमैत्रिणी आहोत. भल्यापहाटे ती मला हातात परडी घेऊन हाक मारीत असे. मग आम्ही ललिता, उषा, मंगला अशा मैत्रिणींच्या घरी विविध फुले आणायला जाऊन शेवटी माझ्या वडिलांच्या गोठ्यामधून गावठी गुलाबी गुलाब भरभरून आणत होतो. भागशाळेत जाताना मी तिला हाक मारल्यावर तिची आई मला जेवल्यावाचून सोडत नसे. फोडणीचं वरण हा तिचा आवडता पदार्थ होता. सुट्टीच्या दिवशी माझा मोठा भाऊ बाळ जाईल व मी विजूबरोबर गोष्टीच्या पुस्तकांचं वाचन करत असू. चांदोबा, अमर चित्रकथा, श्यामची आई. चिं.वि. जोशी, विक्रम नि वेताळ असे साहित्य वाचताना तिच्या अक्कानेर नाशिकच्या रजनीताई लिमये यांनी, दिलेला खाऊ मजेत खात होतो. वडिलांच्या बदलीमुळे ती पनवेल सोडून गेली पण आमचे मैत्र टिकून राहिले. १८ जानेवारीला तिला वाढदिवसानिमित्त फोन केला की पत्नीकडून मधाळ आवाज येतो, 'श्यामे, आठवणीने फोन करतेस बरं. राजा, तू बरी आहेस नं?' मधूर वाणी व स्नेहमय लेखणी म्हणजे डॉ. विजया वाड हे समीकरण प्रत्येकाला पटतं.

थॉमस कार्लाइल म्हणतात : 'त्यांच्याविषयी लिहावं असंच त्यांचं जीवन आहे, इतरांना सतत समजावून सांगावं असं... नव्या युगाच्या नव्या बोलीत पुन्हा नव्याने लिहावे व परत नव्याने उलगडून दाखवावे असे.' विजयाचं आयुष्य असंच संपन्न आहे. तिचं लेखन क्षितिजच मुळी इतकं विस्तारलं आहे की बालसाहित्य, प्रवासवर्णन, कादंबरी, चरित्ररेखाटन, कथासंग्रह अशा इंद्रधनुषी प्रकाराने संपादन केलेले भरघोस यश जणू काही गगनाला भिडलं आहे. तिने लिहिलेली प्रत्येक कथा अत्यंत आटोपशीर असून त्यातील माणसे आपल्या अवतीभवती वावरणारी आहेत.

'सुवासिनी' वरून अखंड सौभाग्यवती हा चित्रपट निघाला तर 'अवेळ' या अप्रतिम गोष्टीवरून चंद्रकला प्रकाशनाने त्या नावाचा कथासंग्रहच काढला, ज्यास जयवंत दळवी या श्रेष्ठ कथाकाराची कौतुकाची प्रस्तावना लाभली. महाराष्ट्र राज्य सरकारने 'आनंदीबाई शिर्के पारितोषिका'ने गौरविलेल्या या लेखनाने समाजमन घडविलं, कोंडलेले श्वास मुक्त झाले व मुंबईमधील एका वृद्ध जोडीने लग्न करण्याचे धैर्य दाखविले. १९८२ वर्षीचा हा विषय २००२ ला 'चि. आईस' या लोकप्रिय नाटकात दिसला. यातच लेखिकेचा द्रष्टेपणा दिसतो. दूरदर्शनने यावर सुंदर नाट्यकृती पेश करून दूरदर्शनवर पहिला पाठ घेणाऱ्या या हाडाच्या शिक्षिकेला दिलेली ही अनमोल पावतीच म्हणायची. कुटुंबकथा या संग्रहातील प्रत्येक गोष्ट लहानथोरांनी एकत्र बसून वाचावी अशी आहे. स्त्रियांच्या मानसिकतेवर आधारलेल्या या गोष्टींमध्ये संयम या गुणास प्राधान्य दिले आहे. 'विश्वास'मध्ये मध्यमवर्गीय मास्तर व त्यांची सरळसाधी पत्नी सरस्वती यांची एकमेकांवर असलेली निस्सिम निष्ठा वाचकांना खिळवून ठेवते. 'आठवणींचा दीपोत्सव' द्वारे विजयाची नामवंत लेखिका असण्याची झिंग उतरते व भारत-पाक युद्धात रक्षामंडल मिळविणाऱ्या डॉक्टर नवऱ्यावरील प्रेम वृद्धिंगत होतं. उठसुठ भांडण करणाऱ्या जुईली-भरत या आधुनिक नवराबायकोला एकमेकापासून लांब गेल्यावर स्वतःच्या हक्काच्या घराची व माणसाची किंमत कशी कळते हे 'अनुबंध'मधून समजत. 'आई' ही कथा विजूच्या मातोश्रीवर लिहिली आहे. अगदी बजा शिपायापासून घरी आलेल्या सर्वांचा प्रेमानं पाहुणचार करणारी ही माऊली स्वतःच्या लाडक्या शेंडेफळ बेबीच पहिलंवहिलं जागृत विद्यापीठ होय. लेकीच्या लग्नावेळी ती सांगते, 'विजू बेटा, सासूसासरे रागावले तरी डोकं शांत ठेवून आत्मपरीक्षण कर. टीकेकडे सकारात्मक दृष्टीकोनाने बघ. पती घर बदलत नाही परंतु पत्नीचं मात्र कलम केलं जातं. तू समजूतदारपणे वाग'. फुलांची आवड असणाऱ्या या वधूने पुढे मुलींची नावे प्राजक्ता व निशिगंधा ठेवली, ज्यांनी

स्वतःच्या क्षेत्रामध्ये मानाच स्थान मिळविलं आहे. ओजस. आर्चिस व ईश्वरी या नातवंडांवर आजीआबांचे सुसंस्कार घडत असतात.

आजच्या अत्यंत वेगवान युगामध्ये पावलोपावली मोहाचे क्षण येतात पण विचारी व्यक्तीचं पाऊल वाकडं पडत नाही. तरीही 'जरा जपून' असा नामी सल्ला याच मथळ्याखाली सापडतो. प्राचार्य वा.ना. दांडेकर यांनी विजया या सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनीला 'आपल्या मातृभाषेतील अविष्कार हा मौल्यवान अलंकार आहे' असा मंत्र दिला. डॉ. न.रा. पारसनीस म्हणजे दुःखावर फुंकर घालणारे व अगाध माणुसकीचं भांडार असलेले ज्ञानी गुरूवर्य होत. 'तिसरी घंटा' हे पुस्तक अशाच तुमच्या आमच्या भावभावनांचं मोहोळ आहे. ही कथा आपल्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांना जागरूक करते. प्रत्येक पिकलेलं पान हे घरातील ठेवणीतील जाळीदार पिंपळपान असते. मरण स्वाधीन नसलेल्या या हतबल खोडांना केरपोते-याप्रमाणे न वागविता त्यांना घोटभर माणुसकी, प्रेमाचे दोन गोड शब्द व ओंजळभर जिव्हाळा पुरविला की हे सुरकूतलेले व थरथरणारे हात मायेची उबदार शाल सर्वांवर पांघरतात. माझ्यासारख्या सामान्य व्यक्ती म्हणजे वेलीचं कमकुवत खोड असतं. विजयासारख्या मजबूत खोडाचा आधार मिळाला म्हणजे दोघींच्याही जीवनाचा अवर्णनीय गोफ विणला जातो. पण कधीतरी विजूपण हळवी होते, तेव्हा ती फोनवर सांगते, श्यामे, माधवनाना व जिरूताई गेली गं. दादापण आता ८०+ आहे. मग मी तिला अुत्तरते, 'अगं, आपले आईबाबा, आत्यामावश्या नाही का आपल्याला सोडून गेल्या? चल, ईश्वरीची एखादी गंमत सांग बरं!'

विजया वाडचं साहित्य सौंदर्य स्नेहाच्या वागण्यापासून सुरू होतं, नंतर दमदार उत्तुंग कर्तृत्वापाशी येतं पण ते थांबत नाही, थांबणारही नाही कारण तिच्या शुद्ध, निरागस, लाघवी मनाप्रमाणेच प्रत्येक वैखरी वाचकाला खूप समाधान देते. सोने अंगावर मिरवून सुख मिळत नाही तर सुखाचा दागिना घालून संसार सोन्यासारखा सजविता येतो असं आचरण करणारी ही माझी सखी 'असली सुंदरता साद्गीमें होती है' याचे साक्षात उदाहरण आहे.

साहित्याचा दर्जा सांभाळणारी व मधमाशीप्रमाणे कामाचे सातत्य टिकविणारी विजया वाड सर्वांना खूप आवडते. डॉ. वाड नवरा बायकोला रव्याचे लाडू व आलू पराठा खूप आवडतात. उभयतांचा यापुढील सहवासदेखील असाच खट्टामीठा राहू दे. ईश्वरापाशी मनापासून प्रार्थना करते की मोत्यासारखं सुंदर अक्षर असणाऱ्या डॉ. विजया वाडचं यापुढील आयुष्य असंच नितळ, पारदर्शक, टपोरं जाऊ दे.

रसिक वाचकहो, दोन वर्षांपूर्वी आमच्या पंचवटी ज्येष्ठ नागरिक संघाने विजयाचा कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. मागल्या वर्षी आमची दोघींची मैत्रिण ललिता बांठीया हिच्या बालकविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याला विजया मुख्य पाहुणी म्हणून आमंत्रित होती. दोन्ही सोहळ्यांना श्रोते इतके रममाण झाले होते की आमचा सर्वांचा ऊर अभिमानाने भरून आला. विजया अशीच तिच्या आप्तांमध्ये, मित्रमैत्रिणींसह व साहित्यकलेच्या वर्तुळात मशगुल राहील याची खातरी आहे. त्यासाठी तिला स्वास्थ्यपूर्ण सुखदाई, शांतीयुक्त व प्रसन्न प्रवास मिळू दे, हीच श्रीगजाननाचरणी मागणी!

❖

---

आरोग्यं धन संपदा

# चले चलो...!

चालणं हा अत्यंत सोपा व्यायाम असून कुठल्याही वयोगटातली व्यक्ती हा व्यायाम करू शकते. चालण्यामुळे चयापचय प्रक्रियेला गती मिळते. शरीराचं वजन नियंत्रित राहतं. चालण्यामुळे कोलेस्टेरॉलच प्रमाण नियंत्रित राहतं. चालण्याने रक्तवाहिन्या तसंच धमन्यांमध्ये ब्लॉक्स तयार होत नाहीत. पर्यायाने हार्ट ॲटॅकसारख्या आजाराचा धोका संभवत नाही.

**चालण्याच्या व्यायामासाठी करायची तयारी**

- चालण्यासाठी सपाट रस्ता किंवा एखादं मैदान निवडावं. चढउतार असलेला रस्ता निवडल्यास चालण्यात अडथळे निर्माण होऊन संपूर्ण शरीरातलं रक्ताभिसरण व्यवस्थित होत नाही.
- दिवसातून किमान दहा हजार पावलं चालायला हवं. रोज आपण किती पावलं चाललो ते पेडोमीटरच्या साहाय्याने मोजावं.
- चालायला सुरुवात करण्याअगोदर थोडासा हातापायांचा व्यायाम करा.
- चालण्यासाठी शक्यतो स्पोर्ट्स शूज वापरावेत. स्त्रियांनी उंच टाचा असणारे सॅण्डल्स वापरणं टाळावं.
- चालताना सोबत जड सामान किंवा वस्तू घेऊन जाणं टाळा.
- चालताना मान ताठ आणि नजर समोर ठेवून चालावं. हातापायांची सरळ दिशेने हालचाल चालू ठेवावी. त्यामुळे चालण्याकडे लक्ष केंद्रित होतं तसंच मेंदूपासून पायापर्यंत संपूर्ण शरीरात रक्ताभिसरण व्यवस्थित होतं.
- चालण्याच्या किमान दहा मिनिटं अगोदर पाणी पिऊन घ्यावं.

❖

# पुत्री-प्रेमाच्या हट्टानंतर
# सर सयाजीरावांनी पण स्त्री स्वातंत्र्यास महत्त्व दिले

• सदाशिव ब. मराठे, (पृ. ३८०), वडोदरा दूरध्वनी - ०२६५-२४२३०५५/२४२८६१८

मातृ-पितृ प्रेम आणि वैवाहिक सहचारी निवडीचा अधिकार अशा कात्रीत सापडलेल्या बडोद्याच्या राजकन्या इंदिराराजे यांचा पिता सर सयाजीराव व माता चिमणाबाई यांजबरोबर वाद विवादाचा प्रसंग निर्माण झाला. राजघराण्यातील व्यक्तींमध्ये सर्वाधिक सुधारणावादी म्हणून गणल्या जाणाऱ्या सयाजीरावांपुढे परिवार की कन्येचं प्रेम अशी मानसिक दुविधा निर्माण झाली असता त्यातून योग्य मार्ग काढून आपली स्त्री-दाक्षिण्याची भूमिका सर सयाजीरावांनी कशी निभावली त्याची ही कथा.

सयाजीराव गायकवाड आपली पत्नी चिमणाबाईसह दिल्ली दरबारात ग्वाल्हेरचे महाराज सर माधवराव सिन्धीया यांच्या परिवाराला भेटले होते. राजकुमारी इंदिराराजे ह्यांचे सर माधवराव यांजबरोबर लग्न करण्याचे ठरले होते. मध्यंतरीच्या काळात राजकुमारी इंदिरा राजे व कुंजविहारचे राजकुमार जितेन्द्र नारायण यांचा त्यांच्या भगिनीद्वारे परिचय झाला. त्यानंतर इंदिरा राजे ह्यांनी माधवराव सिन्धीयांना पाठविलेल्या पत्राच्या अनुसंधानात माधवरावांकडून एक पत्र सयाजीरावांना मिळाले, ज्यात त्यांनी सयाजीरावांकडून स्पष्टता करण्याची विनंती केली होती. सयाजीरावांनी इंदिराराजे यांजकडे ह्या बद्दल चौकशी करता त्यांना इंदिराराजेंनी स्पष्टपणे सांगितले ''मी माधवरावांना पत्राने माझे त्यांच्याशी ठरलेले लग्न रद्द समजावे अशी विनंती केली आहे. कारण त्यांची एक पत्नी हयात आहे'' त्यामुळे २५ जानेवारी १९१२ ह्या दिवशी ठरलेले लग्न पुढे ढकलण्यात आले. इंदिरा राजे यांनी माधवरावांना पाठविलेल्या पत्राने ''तुम्ही मला पती म्हणून पसंत नाही'' असे कळविले तरी सुद्धा माधवरावांनी इंदिरा राजे यांना पुनर्विचार करावे असे कळविले आणि अखेर ऑगस्ट १९१२ अंततः ते लग्न रद्द झाले. त्यानंतर माधवरावांनी लग्न ठरल्यावेळी दिल्ली दरबारात दिलेली अंगठी व इतर भेटवस्तू सयाजीरावांकडे परत पाठवून दिल्या व त्याचबरोबर सयाजीरावांची माफी मागितली. त्यानंतर राजकुमारीने त्यांच्या निर्णयाबद्दल ग्वाल्हेर नरेशला जे दुःख वाटले त्याबद्दल मी (राजकुमारी) जबाबदार असल्याचे कळविले.

ह्यानंतर अनेक राजवाड्यांकडून राजकुमारीसाठी मागण्या येऊ लागल्या पण ''मी कुंचबिहारचे राजकुमार जितेन्द्र ह्यांच्या प्रेमात आहे आणि त्यांचेबरोबरच लग्न करेन'' असे स्पष्ट केले.



जितेन्द्र मराठा क्षत्रिय नसल्याने महाराणी चिमणाबाई ह्या संबंधाचे विरुद्ध होत्या.

ह्यानंतर राजकुमारीने १९१३ मध्ये फेब्रुवारी महिन्यात लग्न करण्याची सयाजीरावांकडून परवानगी मागितली व त्यांत मी १८ मार्चला लग्न करावयाचे ठरविले आहे व त्याकरीता मी १५ मार्चला कलकत्यास जाण्याते ठरविले आहे आणि मी जितेन्द्रशीच लग्न करेन असे निक्षून सांगितल्यामुळे सयाजीराव व चिमणाबाई अतिशय दुःखी झाले.

त्यानंतर सयाजीराव व चिमणाबाई उन्हाळ्यापासून सुटका करून घेण्यासाठी युरोप प्रवासावर गेले व ते एप्रिल अखेर मुंबईला परत येतील त्याचवेळी जितेन्द्रनी यावे असे ठरवून राजकुमारी व जितेन्द्र कलकत्त्याला पळून जाऊन लग्न करून घ्यावे असे ठरले. इकडे इंदिरा राजे पळून जाऊन लग्न करतील ह्या भितीने चिमणाबाईंनी राजकुमारीवर लक्ष ठेवण्याकरीता १३ एप्रिल १९१३ पासून मिस टोटेनहंष नावाच्या महिलेस राजकुमारीबरोबर राहण्याची सूचना दिली.

इकडे सयाजीरावांनी जितेन्द्रला भेटावे म्हणून बोलाविले व त्यास हे लग्न होणे शक्य नाही म्हणून सूचविले, पण जितेन्द्रनी महाराजांना समजाविण्याचा प्रयत्न केला तसेच चिमणाबाईंनाही समजाविण्याचा प्रयत्न केला. ह्या काळात राजकुमारी मिस दोटेन हिज बरोबर मुंबईत फोर्ट भागात जितेन्द्रने राजकुमारीस भेटण्याची परवानगी घेऊन भेट घेतली व रात्रीचे वेळी जितेन्द्रच्या परिवारास भेटण्यासाठी नक्की झाले परंतु दुसऱ्याच दिवशी राजकुमारीस चिमणाबाईंनी स्टीमरमधून युरोपला प्रयाण केले. कुचबिहारचा राजवी परिवार पण युरोपला पोहोचला व ठरल्याप्रमाणे १० जुलै १९१३ या दिवशी सेन्ट मोरीझला आले कुचबिहारच्या राजवी परिवाराने आता त्यांच्या (सयाजीरावाच्या) मुलीवर समजाविण्याचा काही परिणाम होणार नाही असे वाटत होते.

आणि अखेर सयाजीरावांनी काही अटी घालून लग्नास मंजुरी दिली. कुचबिहारच्या राजकुमारीस बोलावून ''राजकुमारी इंदिरा राजे समंजस व योग्य वयात असल्याने आम्ही त्यांच्या निर्णयाचा विरोध करीत नाही. परंतु बडोदे संस्थानात इंदिरा राजे यांना लग्न व्यवहाराचा भागही मिळणार नाही. राजकुमारीस गायकवाडांपासून दूर लंडनला पाठविण्याचे वचन घेतले. १९ ऑगस्ट १९१३ इंदिराराजे मातुश्री चिमाणाबाईपासून दूर निघून गेल्या. त्यांनी मातुश्रीची माफीही मागितली, गुडघेही टेकले, अश्रू वाहिले, परंतु चिमणाबाईंनी दुर्लक्ष केले पण कन्या निघून गेल्यावर मात्र खूप अश्रू ढाळले.

इंदिरा राजे लंडनच्या किंगहॅम पॅलेस हॉटेलमध्ये राहिल्या होत्या. कायदेशीर दृष्टीने लग्नाच्या विधीची सत्यता करण्याकरीता लंडनचे सॉलीसीटर मि. बरेकेटे या तज्ज्ञ कायदेपंडितांद्वारा लग्नाचे कागदपत्र तयार केले गेले. लग्न होताच जितेन्द्रच्या सर्व संपत्तीची मालक इंदिरा राजे होईल. नंतर सयाजीरावांनी जिप्सी हिप्याची कर्णफुले भेट म्हणून पाठविली. २५ ऑगस्ट १९१३ ह्या दिवशी लग्न करण्याचे ठरले व नंतर इंदिरा राजे यांनी सयाजीरावांना पत्र पाठवून ''मी तुमची कन्या आहे हे न विसरता त्यानुसारच वर्तणूक करेन. शक्य झाल्यास मला व जितेन्द्रला माफ करावे.'' तसेच मातुश्री चिमणाबाईस एक पत्र पाठवून कळविले की ''माझ्यामुळे तुम्हास जे दुःख व त्रास वाटला त्या बद्दल माफी करावी.''

ठरलेल्या तारखेला लग्न झाल्यावर सयाजीरावांनी तारेने आशीर्वाद दिले, परंतु चिमणाबाईंनी काहीच लिहिले नाही. लग्नानंतर कुचबिहारच्या महाराजांना देवाज्ञा झाली व इंदिरा राजेचे पती जितेन्द्र गादीवर आले. १९१३ ह्या वर्षातच गायकवाड परिवार बडोद्यास येताच महिलांना आत्मसन्मानाची जाणीवेचा अनुभव व्हावा ह्या दृष्टीने प्रयत्नास सुरुवात झाली. सयाजीरावांच्या इच्छेला मान म्हणून रेल्वे स्टेशन वर महाराणीने पडदा-प्रथा दूर करून प्रथमच जाहीररीत्या खुल्या चेहऱ्याने बाहेर पडल्या. पॅलेस परिसरात झालेल्या समारंभात डोक्यावरचा पदर काढून सर्वांचे स्वागत केले. तसेच जाहीररीत्या टेनिसही खेळल्या. त्यानंतर १९१७ मध्ये राणीसाहेबांनी आपल्या कन्येस (इंदिरास) पत्र लिहिणे सुरू केले. चिमणाबाईंची नात इंदुमती हिच्या लग्नानंतर इंदिराराजे यांची भेट घेतली. रडत रडत इंदिरा राजे आपल्या मातुश्रीस लग्नानंतर प्रथमच भेटल्या. जयपूरच्या गायत्रीदेवी ह्या इंदिरा राजे ह्याची कन्या होत्या. बडोद्यात राजमहालाच्या परिसरातून रेल्वे स्टेशनकडे जाणारा मार्गास ''इंदिरा अेवेन्यु मार्ग'' असे नामकरण झाले होते.

*स्रोत : सयाजी साहित्यमाला ह्या गुजराती ग्रंथावरून संकलन* ❖

# कविता

कोणी तरी सांगा मला नोकरी म्हणजे नेमकं काय?
आपलं पोट भरण्याकरता, कुटुंबात हसणं वाढवण्याकरता
करतो मी काम सतत, करतो सर्वांची मदत
पण कळत-नकळत नखरे करत, हा काळ येतो हसत
मी त्यात जातो बुडत, कामात वाहून जातो परत
दमतं माझ शरीर, रडतात नाजूक डोळे
आणि आखडतात हात-पाय
कोणीतरी सांगा मला नोकरी म्हणजे नेमकं काय?

प्रमोशनचा लॉलीपोप, डोक्याला म्हणजे ताप
फसवा-फसवीमध्ये सगळे, एकामेकांचे बाप
मॅनेजरच ऐकल्यावर, कामात चुका होणार
डोकं लावलं स्वतःचं, तर पुढे कस जाणार
करू कसं मी काम इथे, जिथे हरवते इमानदारी
आणि विकत मिळतं न्याय
कोणीतरी सांगा मला नोकरी म्हणजे नेमकं काय ?

रडगाणं हे नेहमीचं, मी सांगू कसं कोणाला
सुट्ट्या नाही मिळत, आता आपल्याच सणाला
चुकून घेतली सुट्टी तरी, घरूनच करतो काम
घरी राहून पण झालो, आज घरच्यांशीच लांब
दुधाच्या नावा खाली, आपल्या पोटात जातं ताक
आणि ऑफिसर्स खातात साय
कोणी तरी सांगा मला नोकरी म्हणजे नेमकं काय ?

**– सौरभ मराठे**

मोबा. ८१०८५३९४९७/९१०८५३९४९७

# बडोद्याच्या सौ. अंजली आशुतोष मराठे यांचा डोंबिवली येथे सन्मान

• (पृ. ३८०)

दिनांक ८ जानेवारी २०१७ रोजी, डोंबिवली येथील डी एन सी कंपाऊंड, महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ शाळेच्या पटांगणात देवरुखे ब्राम्हण महिला मेळावा समिती आणि देवरुखे ब्राह्मण अनाथ कौटुंबिक निधी यांच्या संयुक्त विद्यमाने ५ वा देवरुखे ब्राह्मण महिला मेळावा आयोजित झाला. या आधी ठाणे, पुणे, शिरगाव व रत्नागिरी येथील सर्व मेळाव्याचे रेकॉर्ड तोडत १००५ महिला या मेळाव्यात उपस्थित होत्या.

या प्रसंगी समाजात विशेष कामगिरी करणाऱ्या पाच कर्तबगार महिलांचा सत्कार करण्यात आला. त्यात भारतीय हवाईदलात तांत्रिक विभागात स्कॉड्रन लीडर या पदावर कार्यरत असणाऱ्या सौ. अक्षदा भोळे दीक्षित, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात HIV संदर्भात जनजागृती करणाऱ्या सौ. मृदुला निंबकर, Adonis Aviation Enterprises या विमान कंपनीच्या मालकीण व प्रसिद्ध उद्योजिका सौ. लीना जुवेकर दत्तगुप्त, विमा क्षेत्रात २७ वर्षे यशस्वी कारकीर्द असलेल्या सौ. वैशाली भागवत यांच्या सोबत सौ अंजली आशुतोष मराठे यांचा ही सन्मान केला गेला. त्यांच्या निवेदन व सूत्र संचालन क्षेत्रातील लक्षणीय कार्याबद्दल उत्कृष्ट निवेदिका पारितोषिक देऊन सत्कार केला गेला.

या मेळाव्याच्या अध्यक्षा प्रसिद्ध उद्योजिका व अनेक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सौ. साधना जुवेकर गंटी (नवी मुंबई) या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. सौ. सुनिती कारूळकर (उंबरगाव) या उपस्थित होत्या.

सौ. अंजली ही सौ. शीला व श्री श्रीपाद यशवंत मुळे यांची कन्या म्हणजेच देवरुख्यांची माहेरवाशीण असून आता श्री. सदाशिव बळवंत मराठे यांची स्नुषा म्हणजेच कोकणस्थांची सासुरवाशीण आहे. बी. कॉम., एल.एल.बी. या पदव्या तिने मिळविल्या आहेत. तसेच १९९० ते १९९३ – पंजाब नॅशनल बँक, राजकोट येथे तर १९९३ पासून सध्यापर्यंत – इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड, गुजरात रिफाइनरी, बडोदे येथे कार्यरत आहे. १९९३ पासून गुजरात रिफाइनरी, क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, मराठी वाङ्मय परिषद, बडोदे, बडोद्यातील विविध महाराष्ट्र मंडळे, बडोद्यातील विविध संस्था – स्वरगंधा, स्वरसेतू, मैत्री, चैतन्य मराठी भाषिक मंडळ, हौशी कला




मंडळ, कऱ्हाडे ब्राह्मण संघ– बडोदे, अखिल गुजरात महाराष्ट्रीय महामंडळ – बडोदे, देवरुखे ब्राह्मण समाज, बडोदे, स्वर–साधना संगीत अकादमी– बडोदे, सरस्वती संगीत विद्यालय, महाराणी चिमणाबाई हाइस्कूल बडोदे, लायन्स क्लब– बडोदे, विक्रम वाचनालय अशा अनेक संस्थांच्या वार्षिक व प्रासंगिक सम्मेलनांचे सूत्र संचालन, अखिल भारतीय सावरकर साहित्य सम्मेलनाचे तसेच देवरुखे ब्राह्मण समाज, बडोदेच्या ५० व्या वर्धापन दिनाच्या तीन दिवसीय सोहळ्याचे सूत्र संचालन, विविध विषय आधारित मराठी व हिंदी गाण्याच्या कार्यक्रमांचे निवेदन व त्यासाठी बडोदे व्यतिरिक्त गुजरातमध्ये भावनगर, सेल्वास, अहमदाबाद, अंकलेश्वर, राजस्थानमध्ये जोधपूर तर महाराष्ट्रात नागपूर येथे प्रवास झाला आहे. मराठी व हिन्दी अंताक्षरी व क्वीजचे संचालन केले आहे. प्रसिद्ध गीतकार/संगीतकार यशवंत देव यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाचे त्यांच्या उपस्थितीत निवेदन केले आहे. सुप्रसिद्ध अभिनेते राजन भिसे यांची मुलाखत घेण्याची संधी तिला मिळाली आहे. सुप्रसिद्ध निवेदक श्री. सुधीर गाडगीळ, निवेदिका सौ. मंगला खाडीलकर, सौ. मालविका मराठे, संगीतकार अशोक पत्की, सौ. वर्षा भावे, लेखक साहित्यिक श्री. प्रवीण दवणे, श्री नरेंद्र जाधव, श्री. विजय कुवळेकर, श्री. सुरेश खरे, डॉ. श्रीफल सबनीस, डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे, प्राध्यापिका प्रतिभा रानडे, साहित्यिका अरुणा ढेरे अशा दिग्गजांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन तिने यशस्वीपणे केले आहे. ❖

# माझी आई

◆ डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, (पृ. १२०), मुंबई दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

जीवनगाथा तुझी संपली। विलीन झालीस अनंतातही।
भेटणार न आता आई। आसू येती नयनी दाटूनी।
उभी मोतीयांची सर आठवणींची ।।१।।

घरकूल आपुले लहानसे। नांदत होती तेथे प्रिती।
समाधान आणि होती शांती। कृपाच होती रामरायाची।
रामभक्तीची होतीस आई ।।२।।

तुझी लेकरे आम्ही लाडकी। शहाणी होतो भाऊबहिणी।
सर्वांवरती तुझीच प्रिती। वात्सल्याची तूच मूर्ती।
सर्वांची तू होतीस आई ।।३।।

मधेच सुटली साथ दादांची। पुत्रशोकही झाला भारी।
परि ना गेलीस खचूनी आई।
जिद्दीची अन् तू धैर्याची। अभिमानाने घरा सावरी।
चंडिकेपरी होतीस आई ।।४।।

झिजवूनी देहा चंदनापरी। गंध भरला आमुच्या जीवनी।
झटलीस तू गं सर्वांसाठी। सोसलेस तू संकटा किती।
शक्तीदेवी होतीस आई ।।५।।



**कै. श्रीमती भारती केशव भातखंडे** (एक स्फूर्तिशलाका)
(जन्म २४-११-१९३२) (निर्वाण ३-३-२०१५)

चैतन्याची अन् स्फूर्तीची। जाण साऱ्या कलागुणांची।
अखंड करूनी नव निर्मिती। सर्वांनाही शिकवण देसी।
उत्साहाची मूर्त आईची।। उर्जा देई स्फूर्तीशलाका ती।
थोर मनाची मायमाऊली। अमर जाहली।
मिळो आसरा ईशचरणासी ।।६।।
नाव सार्थ भारती। ओवाळू आरती ।।७।।

## मार्च २०१६ ते फेब्रु. २०१७ मधील देणगीदार व वर्गणीदार

**• वर्गणीदार : आजीव सभासदत्व** (रु. 500/-) **:** योगेश रवींद्रनाथ (इचलकरंजी), संजीव वासुदेव (इचलकरंजी) राजीव वासुदेव (इचलकरंजी), विवेक अरुण (अमरावती), प्रतिभा अशोक (नालासोपारा), संध्या सदानंद खांबेटे (ठाणे), विद्याधर खांबेटे (बोरीवली, मुंबई), अनामिक (सांगली); **• हितगुज सभासदत्व** (रु. 2000/-) **:** बाळकृष्ण अनंत (झिरंगवाडी, जि. सिंधुदुर्ग), विद्याधर खांबेटे (बोरीवली, मुंबई); **• हितगुज सभासदत्व** (रु. 1000/-) **:** अर्चना काशिनाथ केळकर (देवगड, जि. रत्नागिरी); **• देणगीदार: वैद्यकीय निधी देणगी** प्रमोदन प्रभाकर (पुणे) रु. 9230/, अरुण भिकाजी (तळेगाव) रु. 5000/-; **• शिक्षण निधी देणगी** सुरेंद्रनाथ गणेश (पुणे) रु. 2500/; श्रीमती प्रतिभा प्रभाकर मराठे, अणुशक्तीनगर, मुंबई रु. 15,000/- **• अन्य कार्यासाठी देणगी:** *; • पंचाहत्तरी महोत्सव:* वामन गणेश (पुणे) रु. 10000/- निर्मला जनार्दन (भोपाळ) रु. 1001/-, चिंतामण त्र्यंबक (कळवा, जि. ठाणे) रु. 1000/-, सदाशिव बळवंत (बडोदे) रु. 1500/-.

### : अत्यंत कळकळीची विनंती :

**आपण सभासदत्व शुल्क अथवा देणगी दिली असूनही आपलं नाव या यादीत नसल्यास/ आपल्याला पावती मिळाली नसल्यास कोषाध्यक्ष श्रीनिवास मराठे (भ्रमणध्वनी 9833216468) यांच्याशी संपर्क साधावा.**

**प्रतिष्ठानला देय शुल्क अथवा देणगी आपण IDBI बँकेच्या कोठल्याही शाखेत जाऊन, 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने IDBI बँक, दादर-पश्चिम, या शाखेतील बचत खाते क्र. 0501104000043519 मध्ये रोख किंवा चेकने भरू शकता. वरील खाते क्र. 16 आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहिणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते.**

# चहापुराण

• मोहन मराठे खार, (पृ. ३६५), गोरेगाव भ्रमणध्वनी – ९८१९९६४७६५

सकाळी ५। ला उठलो. गरम पाणी प्यायलो. कालचा अर्धा कप कोरा चहा गरम केला. त्यात मोठ्या पातेल्यातील थंड दूध घातले. दूध नासायला लागले असावे. चहा संपवला. ताजा चहा टाकला. फ्रीजमध्ये दुसऱ्या चांगल्या दुधाचा शोध घेतला. सापडले नाही. ताजा चहा पातेल्यात गाळून ठेवला. परत दुधाच्या शोधास लागलो. फ्रीजच्या गुदामात पाठीमागे एका छोट्या पातेल्यात पाव कप दूध दिसले. चांगले वाटले, तापवले. त्यात मावेल इतका ताजा कोरा चहा ओतला गाळला. पाऊण कप झाला. तो प्यायलो. मिनलची स्वयंपाकीण बाई ६ वा. आली. जाताना तिने ताजे आलेल्या पिशवीतील दूध तापवून ठेवले. मी ताजा थोडा थंड झालेला पाव कप चहा त्यात ताजे गरम दूध घालून घेतला आणि चहाचे पुराण आठवायचा प्रयत्न केला. जसे आठवले तसे लिहिले, दिवसभर लिहीत राहीलो.

लहानपणी आमच्या बार्शीच्या घरी गायीम्हशी असल्याने दुधाचा तोटा नसला तरी आम्हाला म्हणजे माझा मोठा भाऊ मुकुंदा, (सीता) काकू व मी ह्यांना चहाचे वेड, सॉरी डोहाळे लागायचे. शेतात जाऊन आल्यावर आई–काकूनी कथलाच्या तामलीत ठेवलेला कोरा चहा त्यात दूध घालून शेगडीतील थोडे निखारे बाहेर काढून त्यावर तापवायचा व कपात ओतून बाहेर जाऊन घ्यायचा. आमच्या ओट्यावर ऊन्ह आले असल्याने समोरच्या वामनराव जोशांच्या (भाडेकरू – प्र. आ. पराते फोटोग्राफर) ओट्यावर बसून घ्यायचा. श्रमपरिहार व्हायचा.

शाळेच्या गॅदरिंगच्या वेळी मधल्या काळात उदय थिएटरमध्ये कँटीनमध्ये लाखाणी स्टोअरच्या मालकाचा मुलगा घड्याळ अंगठी असलेल्या हातात बशीत ओतून चहा पितानाचे दृष्य डोळ्यासमोर आहे. हेवा वाटला.

कॉलेजसाठी बाळमामाकडे घाटकोपरला राहात असतानाची सकाळच्या चहाची आठवण आहे. मामी ताज्या चहासाठी शिळे दूध (बरेचदा तापवलेले) वापरावयाची. बाळमामाची तीच पद्धत होती. आजही माझी एकट्याच्या चहासाठी तीच पद्धत आहे. आई बाळमामाकडे आली असताना ती रजनीमामीला बजावयाची, मला ताज्या दुधाचा चहा पाहिजे. बाळमामा मामीला सांगायचा ''आक्की, माई (म्हणजे माझी आई) बार्शीची जहागिरदारीण आहे. तिला ताज्या दुधाचा चहा दे.'' स्वातीचीही (पत्नी) तीच पद्धत आहे. शिळे दूध आधी वापरणारे चिक्कू मारवाडी, हिमसुटले अशा शेऱ्यांनी माझे स्वागत होते.

कॉलेजला असताना भाऊने डोंबिवलीला बिऱ्हाड केल्यावर मी त्याच्याकडे राहायला गेलो. मोठ्या वहिनी चहा झटपट करण्यात एक्स्पर्ट होत्या. गॅस नव्हता. स्टोव्ह पेटवायच्या आणि चहा टाकायच्या. पटकन बनवून कपात ओतून द्यायच्या, मी म्हणायचो चहातला 'च' शब्द म्हणताच 'हा' शब्द पूर्ण होण्याआधी वहीनींचा चहाचा कप पुढे येतो. भाऊ पुढे मुलुंडला राहायला गेल्यावर वहिनींची एक पद्धत आवडली. वारणाच्या दुधाची पिशवी फोडून ते पातेल्यात ओतून वहिनी फ्रीजमध्ये ठेवत व प्रत्येकवेळी चहापुरते दूध तापवत.

चेंबूरला कुसूमकडे दुधाचा जोर असायचा. आप्पा (सासरे) मी कसून चहा प्यायचो.

पोतदार कॉलेजमध्ये कँटीनला रिफेक्टरी असे आधुनिक नाव दिले होते. तेथे चहा पिताना आम्ही इंग्लीश फ्रेंच वातावरणात वावरायचो.

रिझर्व बँकेत आम्ही दुपारच्या चहागप्पांसाठी बाहेरच्या रेस्टॉरंटमध्ये जायचो. ऑफिसच्या वातावरणातून बाहेर पडायचो. मार्केटींग फेडरेशनमध्ये मस्जिद बंदरला भटाचा मसालेदार कडक चहा पीत असू.



साखरसंघामध्ये गोड पण छान चहा असावयाचा. राणे शिपाई तो बनवायचा. श्री. विश्वासरावना (पुढे ऑफिस सुपरिंटेंडंट झाले) एकदम गरम चहा लागायचा. चहा भांड्यात न गाळता एकदम

त्यांच्या घशात गाळला तरी चालले असते असे वाटे. कपबशांचा आवाज ऐकण्यासाठी ते अधीर असायचे. एकदा दुपारी ३च्या चहाच्या वेळेला राणेने नुसता कपबशांचा आवाज केला. चहा न आल्याने अस्वस्थ होऊन विश्वासराव चहा बनवण्याच्या रूमकडे धावले. आपली फसगत झाल्याचे लक्षात येऊन ते ओशाळले. त्यांची बोलती बंद झाली.

रिझर्व बँकेत असताना आमचे आवडते सीनियर श्री. वागळे बोरिवलीला राहात. त्यांच्या आडनावावरून श्री. व्ही.बी. जोशी त्यांना वॅगल म्हणत. ते एकदा डोंबिवलीला रिझर्व बँकेतील मित्रांना भेटायला आले. मी त्यांच्याबरोबर फिरलो. दिवसात एकूण १७/१८ कप चहा झाला.

साखरसंघ मुंबई व दिल्ली कार्यालयात माझा दररोज ७-८ कप चहा व्हायचा.

कलकत्त्याला गोवर्धनभाई जयरामदास (ज्यूट मिल मालक व व्यापारी) च्या घरी मसाला घातलेला उत्कृष्ट चहा प्यायला मिळाला. खूप आवडल्याने आणखी तर मिळालाच, पण ‘कोथिंबीर फुकट’ सारखा वर मसाल्याचा डबा मिळाला. आम्ही महाराष्ट्र निवासच्या चहाला कंटाळलो होतो. आमचा मित्र सुभाष खोपकर कलकत्त्याला रिझर्व बँकेच्या गेस्ट हाऊसला रहात असे. त्याच्याकडे उत्कृष्ट चहा (आणि छान पोहेही) मिळाले. साखरसंघाचे घोरपडेसाहेब कलकत्त्याहून ग्रीन टी मागवत. मला तो प्यायचा आग्रह करीत. पण मला तो आवडला नाही.

रेल्वे प्रवासात चहापान होते. त्याचे अनुभव स्मरणीय आहेत. चहा क्वचितच चांगला असतो. रेल्वेच्या ‘खानपान, सेवेतील चहा खास नसतो. मुख्य म्हणजे सकाळी ७ पूर्वी तो मिळत नाही. लवकर उठणाऱ्यांना स्टेशनवर गाडी थांबल्यावर चहाची प्रतीक्षा करावी लागते. बहुतेक वेळेस हा चहा खास नसतो पण रेल्वे चहापेक्षा चांगला असतो व मुख्य म्हणजे सकाळची चहाची गरज भागवतो. पुणे स्टेशनवर सर्वांत रद्दी चहा मिळतो. आम्ही बार्शीहून मुंबईला जाताना कुर्डूवाडीला गाडी बदलावी लागे. त्यावेळी दत्तूमामा स्टेशनमास्तर असे व आक्कीसाठी स्पेशल चहा मिळे. उत्तरेकडे मातीच्या मटक्यातून कोळू-चहा मिळे. चहा पिऊन मटके फेकून द्यायचे. गाडीचे डबे सतत हलत असल्याने चहा पिताना फारच कसरत करावी लागते.

दिल्लीला नॅशनल फेडरेशनच्या गेस्ट हाऊसला आम्ही चहा कपातून बशीत ओतून पीत असू. अध्यक्ष श्री. राजगोपाल नायडू आमचेकडे बघत राहात. त्यांनी खुलासा केला की तामिळनाडूमध्ये त्यांच्याकडे फक्त मुस्लीम लोक चहा बशीत ओतून (फुर्फुर् करीत) पितात. इतर लोक कॉफीच पीत असावेत. मद्रासी लोक भातावर सांभार, रसम्, ताक घालून पाची बोटांनी तो कालवून, की कणकेसारखा मळून त्याचे गोळे करून ते मटकावत.

दार्जिलींग सहलीत आम्ही माऊंटेनियरिंग इंस्टिट्यूट पाहिल्यावर जवळच रस्त्यावर चहा प्यायलो. त्याची अप्रतिम चव ओठावर आहे. आम्ही पावडर विकतही घेतली.

दार्जिलींग, आसाम, मॉरिशस तसेच वायनाडला आम्ही चहाच्या मळ्याला भेट दिली. चहाचे मळे डोंगर उतारावरच असतात अशी आपली समजूत असते ती बरोबर नाही. आसामात सपाट जमिनीवर चहाचे मळे असून एक झाड ४० वर्षे चहाची पत्ती देते.

आठवणीतला चहा म्हणजे दुबई सहलीत. गोपाळराव केळकर (यजमान) सोनेरी काठाच्या मग्समध्ये उकळते पाणी घालून त्यात टी बॅग सोडत. साखर घालायची. वरती क्रीमर घालायचे. चहाला अप्रतिम चव असायची. सारखा घेतच राहावा असे वाटे.

जपानमध्ये चहापानाचा खास कार्यक्रम असतो. श्री. सा. रे. पाटील, राणेसाहेब व मी स्थानिक सहलीत सहभागी झालो होतो. टी प्रोग्रामसाठी एका ठिकाणी गेलो. जमिनीवर बसलो. किमोने परिधान केलेल्या जपानी युवतीने जमिनीवर बसून स्टाईलमध्ये किटलीत चहा बनवून कपात ओतून आम्हाला समारंभपूर्वक पाजला.

लंडनमध्ये हॉटेल रेस्टॉरंटमध्ये गरम चहा किटलीत देत व दुसऱ्या किटीलीत थंड दूध देत. गरम दूध मागितल्यावर गरम दुधाची किटली आणून देत पण तोपर्यंत गरम चहा थंड झालेला असे. लंडनमध्ये भारतीय चहापेक्षा श्रीलंकेचा चहा जास्त लोकप्रिय आहे. तो लालसर असतो. चहाच्या मार्केटिंगमध्ये श्रीलंकेने भारतावर आघाडी घेतली आहे. उत्कृष्ट पॅकिंग, चिनी मातीच्या छोट्या भांड्यातून छोटी पॅकेट्स घ्यावीशीच वाटतात. कोलंबो भेटीत आम्ही ती हमखास घेत असू. लेमन टी, जिंजर टी, हर्बल टी अनेक प्रकारची पॅकेटस् असत. त्यांच्याकडे दिलमा आदी चहा कंपन्या क्रिकेट खेळाडू, मॅचेस ह्यांचा पुरस्कार करतात.

हॉटेल्समध्ये पूर्वी रूम सर्व्हिसला चहा मागावा लागायचा. आता रूममध्ये पाणी गरम करायची किटली, चहा साखर कॉफी, कोको, दूध पॅकेटस असतात. हवा तेवढी चहा कॉफी घ्या. मजा वाटते.

परदेशात कुणाकडे मुक्कामाला राहिल्यास मी रात्री झोपण्यापूर्वी गृहिणीकडून गॅस, लायटर, भांडी, गाळणे, चहा साखर दूध, कप इ. माहिती करून घेत असे. कारण तिला सकाळी लवकर उठायची तसदी नको.

अमेरिकेमध्ये चहापेक्षा कॉफी सर्वमान्य. अमेरिकेत व्यापारी दृष्टीकोनातून क्रिकेट खेळ लोकप्रिय करण्याचा प्रयत्न भारत करीत आहे. माझी भारताला सूचना आहे की त्यांनी अमेरिकेत आधी चहा लोकप्रिय करावा. क्रिकेट आपोआपच लोकप्रिय होईल.

चहा आपल्याला अत्यंत प्रिय असला तरी तो बनवण्याची कृती, नव्हे कृत्या अफाट आहेत आणि धडकी भरण्यासारख्या आहेत. पाणी उकळत ठेवून त्यात साखर घालणे, उकळी फुटल्यावर चहाची पावडर घालणे. तो थोडा उकळून गॅसवरून खाली उतरवणे. नंतर तो गाळून त्यात दूध घालून कपात ओतणे ही सर्वसाधारण पद्धत. पण ह्याला किती बारकावे आहेत पाहा.

किती कप पाणी घेऊन उकळले तर किती कप चहा होतो हे पाणी किती उकळणार, त्यात किती चमचे चहा घालून तो किती उकळणार व तो किती वेळ मुरून त्यात किती दूध घालणार ह्यावर अवलंबून असते.

कमी पावडर, कमी उकळणे, मुरणे तर कमी दूध लागते.

कमी पावडर, जास्त उकळली, जास्त मुरली तर जास्त दूध लागते.

जास्त पावडर, जास्त उकळली, जास्त मुरली तर जास्त दूध लागते.

चहा पावडरीमध्ये ही कडक सौम्य प्रकार असतात.

आता चहात साखरेचे प्रमाण किती? एका कपाला १ चमचा (५ ग्रॅम) साखर हे प्रमाण. पण ही साखर पाण्याच्या कपाला एक चमचा घालावयाची की एक कप पाण्याचा दूध घालून सव्वा कप चहा होतो म्हणून १। चमचा घालावयाची? साखर प्रत्येकाला कमी जास्त लागते म्हणून बिनासाखरेचा कोरा चहा (लघुत्तम साधारण विभाजक) करून दूध कमी जास्त घालून त्याप्रमाणे साखर घालावयाची? अनेकांना वरून साखर घालून ढवळल्याने चहा थंड होतो म्हणून ही पद्धत आवडत नाही. त्यामुळे लसावी मसावी परम्युटेशन्स कॉबिनेशन्स गणिते करून कमी साखरेचा चहा करून दूध घालून जरूर त्याला जादा साखर घालणे सोयीस्कर पडते.

चहामध्ये आता गवती चहा, आले, मसाले, लिंबू घालण्याचा प्रकार आहे. पण कुणाला तो चालतो तर कुणाला नाही. चहामध्ये कुणाला कडक तर कुणाला सौम्य पावडर लागते. दूध कमी जास्त (शून्य ते पाव कप) लागते. साखर कपाला शून्य ते २ चमचे (१० ग्रॅम) लागते. दूध चहा साखर मिश्रित हर्बल गिरनार चहा विमानात १०० रु. ला एक मग मिळतो.

घरात माणसे बरीच असतील किंवा अनेक पाहुणे आले असतील तर प्रत्येकाला त्याच्या आवडीचा चहा, सर्वांना एकदम गरम देणाऱ्या गृहीणीला किमान पद्मश्री द्यायला पाहिजे.

पिशवी गरम पाण्यात बुचकळून केलेला चहा

इराण्याच्या हॉटेलातील विचित्र चवीचा चहा

शेट्टीच्या हॉटेलातील मोठ्या कपातील न संपणारा चहा

अमृततुल्य हॉटेलमधील कधीच संपू नये वाटणारा इलायची चहा

लग्नकार्यात कप मोजून दिला जाणारा व्यावहारिक पण चविष्ट चहा

पावसाळ्यातला गरम गरम गवती चहा

सासुरवाडीचा नक्षीदार कपातून आलेला मसाला चहा

फाईव्ह स्टार मधला गरम थर्मासमधून खोलीत आलेला

आजारपणात बायकोने औषधासाठी कंटाळवाणा दिलेला फिकट चहा

आपणच आपल्यासाठी केलेला प्रमाण चुकलेला कडवट चहा

गावाकडच्या मित्राकडे घेतलेला गुळाचा चहा आणि सर्वात सुंदर चहा म्हणजे आपल्या मुलीने पहिल्यांदाच बाबांसाठी केलेला दुप्पट साखरेचा स्ट्राँग चहा

भारतात चहा हा नुसता चहा नाही, ती एक भावना आहे. चहाच्या चवीमध्ये बेमालुमपणे मिक्स होऊन येणारी ती आपुलकी आहे. ❖

## हसरे हितगुज

**भूगोलाचा तास सुरू असतो**

**सर : भारतातील सर्वात धोकादायक नदी कोणती?**

**गणू : भावना**

**शिक्षक : कशी?**

**गणू : कारण सगळे भावनेच्या भरात वाहून जातात.**

**(सरांनाही भावना अनावर झाल्या)**

# संस्कृत शनिस्तोत्राची सुरुवात, 'श्रीगणेशाय नमः' म्हणून का होत नाही?

• सौ. विजया का. मराठे-खोर्ली, (पृ. ५२६) म्हापसा-गोवा

हितगुजच्या सप्टेंबर २०१६ च्या अंकामध्ये श्री. सदाशिव बळवंत मराठे-बडोदे यांनी जीवेत् शरदः शतम् या लेखाच्या अनुषंगाने एका प्रश्नाच्या उत्तरांची वाचकांकडून अपेक्षा केली आहे. त्याप्रमाणे मी माझ्या विचारशक्ती प्रमाणे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न :- सर्व देव-देवतांच्या स्तोत्रांची सुरुवात श्री गणेशाय नमः म्हणून होते. पण संस्कृत शनिस्तोत्र ह्याला अपवाद का?

श्री गणेश देवतेचे महत्त्व श्रेष्ठ आहे.

श्री गणेश ऐक्याचे प्रतिक आहे. द्वैता द्वैताचे एकीकरण. शैव वैष्णवाच्या एकीची गाठ बांधणारे दैवत. विष्णूच्या वरदहस्तामुळे विष्णू भक्तास मान्य, शंकराचा पुत्र म्हणून शिवभक्तास प्रिय आणि कन्या सरस्वती देवून ब्रह्मदेवाने जावई केल्यामुळे तो सर्व ब्रह्मांडात भरून राहिला आहे. कार्याचा आरंभ 'श्री' पासून व्हावा असा शास्त्रात सिद्धांत आहे. आपत्तीमध्ये, संकटामध्ये गणपती दैवत आधार देते. शत्रूचा संहार करते. ग्रहदशेचे ग्रहण दूर करते. म्हणून कुठले ही मंगल कार्य शुभकार्य असेल तर गणपतीचे प्रथम पूजन करतात.

शालेय जीवनात पाटीवर श्री गणेशाय नमः अशी सुरुवात करतात. पण शनिदेव नऊ ग्रहांमध्ये श्रेष्ठ आहे. या नऊ ग्रहाची माहिती शनि महात्म्यामध्ये दिलेली आहे.

शनिदेव श्रेष्ठ अवघ्यात। बलाढ्य होय अति अद्भूत न कळे कळा तयाची। तो ज्यावरी करी कृपा, तयासी मार्ग असे सोपा।

ग्रह दिक्पाळावरी छाया। तया शनिग्रहाचा

ज्यावरी तो कोपास चढे। तयावरी नाना विघ्ने येती रोकडे।।

तयाचा संसार बिघडे। नराहे कलपांती

शनिदेव महाक्रोधी। त्याचा पराजय नोहे युद्धी।

त्याने देव दानवांनासुद्धा दुःख दिले आहे

तो जेव्हा जन्मला तेव्हा; त्याची दृष्टी पित्यावर पडली तेव्हा तो कुष्ठरोगाने भरला. पित्याच्या रथाला सारथी होता. तो पांगळा झाला व अश्व आंधळा झाला, असे गणेशाच्या बरोबर विपरीत शनिचे गुण आहेत. त्यामुळेच कोणत्याही संस्कृत शनिस्तोत्रात किंवा शनिमहात्म्य व मराठी शनिस्तोत्र यांच्या सुरुवातीला श्री गणेशाय नमः अशी सुरुवात केली जात नाही.

❖

# माहेर

माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जिची किंमत तिथे असेपर्यंत कळत नाही
माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जी पैश्यांनी विकत मिळत नाही.
माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जिथे कोणी आपल्याकडून काहीही अपेक्षा करत नाही.
माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जिथे कधी आपल्याला एकटं वाटत नाही.
माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जिथे रडणं, हसणं,
खिदळणं, खाणं-पिणं या शिवाय आपण काही करत नाही.
माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जिचं स्थान पुरुषांना कधीच कळणार नाही.
माहेर म्हणजे काय?
अशी एक जागा जिथे आई नाही तर काही नाही.

**सुविचार**

टाळी वाजवावी । गुढी उभारावी
वाट ती चालावी । पंढरीची ।।

उन्मनीच्या सुखा आत।
पांडुरंग भेटी देत।।

# चाहेंगे तुमको उम्रभर - मुकेश

• सुधाकर दत्तात्रय तथा बाळ मराठे (पृ. २५२), पुणे भ्रमणध्वनी - ९८२२३२९७७०

आयुष्यात प्रथमच पार्श्वगायनाची संधी मिळाली होती. पण नवीन शहर, मनात धाकधूक, गाणी म्हणण्याचे दडपण, एका अनामिक भितीनेच तो तरुण बराच उशिरा रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये पोहोचला होता. संगीतकार (अनिल विश्वास), दिग्दर्शक सगळे घुश्श्यातच होते आणि त्याचे स्वागतही अपमानानेच झाले.



पण सारा अपमान, सारं दुःख मनातच एकवटून तो तरुण सरळ रेकॉर्डिंगला उभा राहिला आणि गळ्यातून करूण रस दर्दभरा आवाज बाहेर आला.

दिल जलता है तो जलने दे,
आंसू न बहा फरियाद न कर...

आपली व्यथाच त्या गाण्यातून ज्याने सादर केली. (संगीत, दिग्दर्शक अनिल विश्वास - चित्रपट पहली नजर) तो तरुण म्हणजेच - मुकेश!

त्या काळी सर्वच गाण्यावर पार्श्वगायक सैगलांची छाप होती. शिवाय ध्वनिमुद्रिकेवर गायकाचे नाव नसे, त्यामुळे पुढे कित्येक दिवस हे गाणे 'सैगल'नेच गायले आहे असा अनेकांचा विश्वास होता. पण ज्याने हा विश्वास खोटा ठरविला होता, तो महान गायक म्हणजे 'मुकेश'!

२२ जुलै १९२३ रोजी दिल्लीमध्ये जन्मलेला मुकेशचंद माथुर, घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे फारसा शिकलाही नव्हता. त्यामुळेच घरासाठी त्याला नोकरीही करावी लागत होती. पण छोट्याशा नोकरीत तो रमलाच नाही. गायनाची आवड, सैगल टाईप आवाज आणि देखणेपण या जोरावर तो छोट्या मोठ्या कार्यक्रमात गात होता. सैगलचा आवाज म्हणून ओळखला जात होता.

खरंतर हा देखणा तरुण सिनेसृष्टीमध्ये नायकही बनला होता. (चित्रपट - निर्दोष, नायिका - नलिनी जयवंत, तसेच चित्रपट 'माशुका', नायिका सुरैया आणि चित्रपट अनुराग - नायिका उषा किरण) पण हे सारे चित्रपट अपयशी ठरले. प्रेक्षकांनी त्याला नायक म्हणून स्वीकारलेच नाही, सहनायक म्हणूनही (चित्रपट - अनुराग) तो स्वीकारलाच गेला नाही. आज साठीच्या घरात असलेल्या पिढीला मात्र 'आह' चित्रपटातील 'छोटीशी ये जिंदगानी रे' म्हणणारा टांगेवालाच आठवतो, अर्थातच तो 'टांगेवाला' म्हणजेही 'मुकेशच'!

चित्रपट सृष्टीतील इतर अनेक गोष्टीत तो रमला नाही हे आपले भाग्यच! नाहीतर आपणही कदाचित एका महान गायकाच्या दर्दभऱ्या आवाजाला मुकलो असतो.

स्वतः सैगल यांनीच 'स्व. मोतीलाल' यांच्या घरीच एका मैफलीत मुकेशची गाणी ऐकली आणि त्याला भरभरून आशीर्वाद तर दिलेच. पण स्वतःचा 'हार्मोनियम' ही त्याच्या स्वाधीन करून एका अनोख्या आवाजाची जादूभरी देणगीच दिली आणि मुकेशनेही स्वतःच हा हार्मोनियम वाजवत अनेक गाण्यांचे पार्श्वगायन केले.

स्व. मोतीलाल सारख्या महान कलाकार आणि संगीतकार स्नेहल भाटकरांमुळे मुकेश हळूहळू चित्रपट सृष्टीत स्थिरावू लागला. स्नेहल भाटकरांनीच राजकपूरला उसना आवाज देण्याचे भाग्य मुकेशला मिळवून दिले. (चित्रपट 'निल कमल') स्नेहल भाटकरांची इतर गाणी आज बरीच विसरली गेली आहेत. पण त्यांनीच मुकेशकडून गाऊन घेतलेले 'फरिश्तोंकी नगरी से मै आ गया हूँ' (चित्रपट - हमारी याद आयेगी - सहगायिका लता मंगेशकर) हे गीत आजही लोकप्रिय आहे. पुढे हळूहळू मात्र मुकेशचा आवाज म्हणजे राजकपूरच हे समीकरण घट्ट होत गेले.

त्यानंतर 'नौशाद' सारख्या संगीतकाराने मात्र प्रयत्नपूर्वक मुकेशला 'सैगल' छायेतून बाहेर काढले आणि 'मेला' चित्रपटात दिलीपकुमारला मुकेशचा उसना आवाज मिळाला. (गाये जा गीत मीलन के) आणि मग साधेपणाने आणि सच्चेपणाने गाणी गात मुकेश चित्रपटसृष्टीत प्रस्थापित होऊ लागला.

नौशादजींनी मग मुकेशच्याच आवाजात 'तू कहे अगर जीवन भर', 'झूम झूम के नाचो आज', 'हम आज कही दिल खो बैठे' (चित्रपट - अंदाज) सारखी अजरामर गाणी दिली. पण पुढे तब्बल १८-१९ वर्षांनी नौशादने मुकेशला गाणे दिले (मेरा प्यार भी तू है - चित्रपट - साथी) कारण माहीत नाही, पण त्यापुढे मात्र नौशाद आणि मुकेश हे समीकरण फारसे समोर आलेच नाही.

सुरुवातीच्या काळात हंसराज बहल, बुलो सी. रानी, एस.एन त्रिपाठी, अनिल विश्वास यांच्यासाठीही मुकेशने अनेक उत्तमोत्तम गीते गायली, पण काळाच्या ओघात त्यातील अनेक विस्मृतीतही गेली. तरीही बरसात चित्रपटातील लता मंगेशकरसह गायलेली 'छोड गये बालमं', 'पतली कमर है' (संगीत - शंकर जयकिशन) 'तेरी दुनिया में लगता नही' (चित्रपट - बावरे नैन - संगीत रोशन) 'ये मेरा दिवाना पन है' (चित्रपट - यहुदी) तसेच 'आँसू भरी है ये जीवन की राहे' (चित्रपट - परवरीश - संगीत दत्ताराम) 'दिल तडप, तडप के कह रहा है' 'सुहाना सफर और ये मौसम हसी' (मधुमती - सलील चौधरी) 'नैंना है जादू भरे' (बेदर्द जमाना क्या जाने - कल्याणजी, वीर जी शाह) 'एक रात में दो दो चांद खिले' (बरखा - चित्रगुप्त) 'लौट के आऽ लौटके आजा' (रानी रूपमती - एस.एन. त्रिपाठी) 'चल री सजनी अब क्या सोचे' (बंबईका बाबू - एस.डी. बर्मन) इत्यादी अनेक सुरीली गाणी आजही स्मरणात आहेत.

१९५५/१९६० ते १९७० पर्यंत राजकपूर - शंकर जयकिशन आणि मुकेश ही अफलातून भट्टी जमली होती. बरसात, आवारा, आह, श्री ४२० अनाडी. आशिक, संगम, जिस देश में गंगा बहती है, तिसरी कसम, दिवाना, मेरा नाम जोकर इ. चित्रपटांची नुसती नावे जरी आठवली तरी अनेक भन्नाट गाणी आपोआप ओठांवर येतात. वास्तविक जीवनातही हे सर्व जण अगदी शैलेंद्र व हसरत जयपुरी सारखे गीतकार आणि लता मंगेशकरसारखी गायिका यांचे एक कुटुंबच झाले होते. लतादिदीने तर मुकेशला आपला भाऊच मानले होते. (जागेअभावी अनेक गाण्यांचा उल्लेख करता येत नाही, म्हणून चित्रपटांच्या नावांचा उल्लेख केला आहे.) या सर्व चित्रपटातील सर्वच गाणी अतिशय गाजली होती, आजही ऐकावीशी वाटतात.

एक गोष्ट मात्र खरी की, त्याच काळात अतिशय गाजलेल्या चित्रपटातील (चोरी, चोरी) एकही गाणे मुकेशने गायले नव्हते. लता, शंकर - जयकिशन, राजकपूर इ. सारे असूनही आवाज मात्र मन्नादांचा वापरला होता.

त्यानंतर मात्र शंकर - जयकिशन यांचे साम्राज्य लोप पावत गेले आणि हळूहळू कल्याणजी - आनंदजी, लक्ष्मी, प्यारे पंचमदा (आर. डी. बर्मन) यांचा जमाना सुरू झाला. यातही कल्याणजी-आनंदजी यांनी मुकेशचा फार सुंदर वापर केला.

'चंदन सा बदन', 'फुल तुम्हे भेजा है' - सरस्वती चंद्र
'चाँदी की दिवार ना तोडी' - विश्वास
'क्या खूब लगती हो' - धर्मात्मा
'हम छोड चले है महिफल को' - जी चाहता है
'चांद सी मेहबुबा हो मेरी कब' - हिमालय की गोद में
'चांद आहे भरेगा' - फूल बने अंगारे
'जो प्यार तुने' - दुल्हा दुल्हन
'जिस दिल मे बसा था प्यार' - सहेली

या सर्व गाण्यांबरोबरचे खरोखरच 'मास्टर पिस' म्हणता येईल असे गाणे.

**'कोई जब तुम्हारा हृदय तोड दे'** - पुरब और पश्चिम. असे म्हणतात की चार-पाच रिटेक नंतरच कल्याणजी आनंदजी यांनी हे गीत ओके केले होते. पण स्वतः मुकेश यांनीच या गाण्याचा ५१ वेळा रिटेक केला व या अवीट व अजरामर गाण्याचा जन्म झाला.

लक्ष्मी-प्यारेंनी मुकेशकडून
'ज्योत से ज्योत जगाते चलो' - संत ज्ञानेश्वर
'राम करे ऐसा हो जाय' - मिलन
'इक प्यार का नगमा है' - शोर इत्यादी गाणी गाऊन घेतली.

राहूल देव बर्मनने मुकेशला फार कमी संधी दिली, कारण त्यांच्या गाण्यांच्या 'स्टाईल'मध्ये मुकेश फिट बसणारा नव्हताच. तरीही 'जिस गलीमें तेरा घर ना हो बालमा' (कटी पतंग) याशिवाय 'धरम-करम' मधील 'इक दिन बिक जायेगा' सारखे हिट गाणे त्यांचेच.

इतर अनेक संगीतकारात मुकेशची सहजच आठवणारी गाणी म्हणजे -

'छोडो कलकी बाते' - हम हिंदुस्थानी - उषा खन्ना
'बरखा रानी जरा जम के बरसो' - सबक - उषा खन्ना
'सारंगा तेरी याद में' - सारंगा - सरदार मलीक
'ये मौसम रंगीन समा' - मॉडर्न गर्ल - रवि
'वफा जिनसे की बेवफा हो गये' - प्यार का सागर - रवि
'भुली हुई यादे' - संजोग - मदन मोहन
'बिखराके जुल्फे चमनमे' - नजराना - रवि
'तुम अगर मुझको न चाहो तो' - दिल ही तो है - रोशन
'बहुत दिया देने वालो ने' - सुरत और सिरत - रोशन
'ये किसने गीत छेडा' - मेरी सूरत तेरी आँखे - एस.डी. बर्मन

अनेक रसिकांना आजही ऐकावीशी वाटणारी ही काही अवीट चालीची गाणी.

मुकेशचा आवाज हा तुमच्या आमच्या सारखा होता. सर्वसामान्य माणूस जसा सहज गुणगुणतो, तसा. **आयुष्यात अनेकदा आपले मन सैरभैर झालेले असताना मुकेशची अनेक गाणी आपल्या ओठांवर सहजपणे आली असतील आणि नक्कीच मन आनंदी, समाधानी झाले असेल.** गुणगुणून तर पाहा ही काही 'खास' मुकेश 'टच' गाणी.

'डम डम डिगा डिगा' – छलीया
'सब कुछ सिखा हमने ना सिखी होशियारी'' (अनाडी)
'मेरा जुता है जपानी' – श्री ४२०
'चाँदसी मेहबूबा हो मेरी कब' – हिमालय की गोद में
'बरखा रानी जरा जमके बरसो' – सबक
'कभी कभी मेरे दिल में' – कभी कभी
'दोस्त दोस्त ना रहा' – संगम
'कोई जब तुम्हारा हृदय तोड दे' – पूरब और पश्चिम
'जाने कहा गये वो दिन' – मेरा नाम जोकर
'सजन रे झूठ मत बोलो' – तिसरी कसम
'जीना यहाँ, मरना यहाँ' – मेरा नाम जोकर

अशा प्रकारच्या असंख्य गाण्यांनी, अनेकदा आपल्या जीवनात साथ दिली असेल, कारण एकच – स्वच्छ, प्रामाणिक, हृदयातील वेदना जाणणारा, भावनिक, दर्दभऱ्या आवाजांचा गायक – मुकेश!

खरंतर या अल्पशा लेखात, मुकेशच्या अनेक सुंदर गीतांचा उल्लेख न होणे अपरिहार्यच आहे. हिंदी बरोबरच पंजाबी, भोजपुरी, गुजराथी, बंगाली अशा अनेक प्रादेशिक भाषेतही मुकेशने अनेक गाणी गायिली आहेत. मराठीतही 'मी तुझा नव्हतो कोणी एकदा येऊन जा' (चित्रपट – सप्तपदी किंवा नंदादीप) असे एकमेवच आठवणारे गाणे.

आपल्या खाजगी आयुष्यातही मुकेश असाच होता. साधा, सरळ, प्रामाणिक अगदी त्याच्या गायलेल्या असंख्य गाण्यांसारखा. उमेदीच्या काळातच मुकेश एका गुजराथी मुलीच्या प्रेमात पडला होता. 'सरला शहा' नावाच्या, पण काहीच धड स्थिरता नसलेल्या मुकेशशी लग्न करण्यास 'सरला'च्या पालकांचा विरोध होता. पण 'सरला'ने मुकेशला शेवटपर्यंत साथ दिलीच.

कायमच विनम्र आणि इतरांच्या मदतीला तयार असणाऱ्या मुकेशने चित्रपटांशिवायही अनेक गाणी, गझला आणि भजनेही गायिली आहेत. गोस्वामी तुलसीदासांचे महाकाव्य, श्रीरामचरित्र मानस म्हणजे मुकेशच्या भावपूर्ण स्वराला मिळालेली देणगीच आहे.

मुकेशने गायलेल्या अनेक गीतांपैकी पुढील गाण्यांना ॲवॉर्ड मिळालेली आहेत.

'सबकुछ सिखा हमने' – अनाडी – सर्व श्रेष्ठ गायक
'सबसे बडा नादान' – पहचान – फिल्म फेअर पुरस्कार
'बोलो बेईमान की जय' – बेईमान

सर्वश्रेष्ठ पार्श्वगायकाचा राष्ट्रीय पुरस्कार – 'कई बार यू भी देखा है' – रजनीगंधा – १९७४ आणि 'कभी कभी मेरे दिल में खयाल आता हैं' या गीताला (कभी –कभी) मरणोत्तर सर्वश्रेष्ठ गायक म्हणून मुकेशला गौरविण्यात आले आहे.

आजच्या पिढीला शब्दांची तोडफोड केलेली, अनेक भाषांची भेसळ करूनच धडगुजरी पद्धतीने गायिलेली, जुन्या गाण्यांची तोडफोड करून बनविलेली रीमिक्स प्रकारची गाणीच आवडत असताना, मुकेशची गाणी म्हणजे कदाचित रडकी गाणीच वाटत असावीत. पण आज साठीच्या वयाला असलेल्या आमच्या सारख्यांच्या पिढीतील रसिकांना मात्र मुकेशची गाणी आणि त्यातील 'दर्द' कधीच विसरता येणार नाही.

मुकेश नेहमीच, स्वतःला 'बहोत छोटा' कलाकार आणि 'बेसूर आवाजातला' समजत असे. म्हणूनच कोणतेही गाणे अगदी मनापासून गायचा. राजकपूर बरोबर त्याचे 'मित्र' म्हणून अनोखे संबंध होते. मुकेश परदेश दौऱ्यावर 'लता'सह जाणार होता, म्हणूनच राजकपूरने 'सत्यम शिवम सुंदरम'ची गाणी त्या दौऱ्याच्या आधीच रेकॉर्ड करून घेतली होती. प्रत्येक रेकॉर्डिंग नंतर रात्रभर चर्चा व्हायच्या, 'मदिरेबरोबरच' रात्री रंगायच्या.

मुकेशची शेवटची मैफल मात्र रंगलीच नाही, लतादिदींबरोबर अमेरिकेतील डेट्राईट येथे कार्यक्रम सादर करण्यासाठी गेलेला मुकेश तेथेच 'हार्ट ॲटॅक'ने गेला. अनेकांच्या हृदयात अनेक चिरस्मरणीय गाणी अजरामर करणारा मुकेश गेला ती तारीख होती २७ ऑगस्ट १९७६ आणि तिथी होती 'गणेश चतुर्थी!'.

'मै पल दो पलका शायर हूँ' (कभी–कभी) हे मुकेशचेच अजरामर गाणे, पण अनेक रसिकांची अशीच भावना असेल की हा तर 'हर एक पलका गायक' आहे.

हजारो रंगांची लोकप्रिय गाणी गाणारा मुकेश त्याचा आवाज, शब्द आणि त्याच्या मागची तपश्चर्या, या गोष्टी समजल्या तर मुकेशची गाणी नुसतीच समजणार नाहीत, तर पुन्हा पुन्हा ऐकाविशी वाटतीलच.

*टीप : वरील लेखनासाठी श्री. सुभाषचंद्र जाधव आणि श्री. राजीव श्रीवास्तव यांच्या पुस्तकातील लेखांचे साहाय्य मिळाले, त्यांचा मी आभारी आणि ऋणी आहे.*

❖

# नोकरीच्या वेळी आलेले अनुभव

• श्रीमती सुनंदा अरुण मराठे, (पृ. २१), कणकवली

**मी** आरोग्य खात्यात नर्स म्हणून नोकरी करीत असताना मसुरा उपकेंद्रामध्ये काम करीत असताना त्यावेळी घरी जाऊन प्रसुती करावी लागत असे. मी ता. २/७/१९७४ रोजी एका वाडीत प्रसुती करण्यासाठी गेले होते. पावसाचे दिवस होते, त्यात ज्या वाडीत प्रसुती करावयासाठी गेले त्या वाडीच्या चारही बाजूंनी खाडीचे पाणी व मध्ये १६ घरांची वाडी. जातेवेळी पाणी कमी असल्यामुळे होडीने घरापर्यंत नेले. नंतर पाऊस वाढू लागला. ज्या बाईची प्रसुती करावयाची तिची शारीरिक अवस्था पण बिकट होत होती. तिच्या नॉर्मल प्रसुतीची शक्यता कमी होत होती. बाळाची जागा बदलली होती. त्यामुळे नॉर्मल प्रसुती होणे व बाळंतीण दोघेही सुखरुप राहाणे खूपच कठीण झाले. बाळाचे नाडीचे ठोकेही कमी होत चालले होते. नातेवाईकांना परिस्थितीची जाणीव करून दिली व मालवणला न्यावे लागेल मी सोबत येते म्हणून सांगितले. परंतु होडी एवढ्या पाण्यामधे घालायला कोणी तयार होईना तसेच रात्रीची वेळ, वाहन पण मिळणे मुश्कील त्यामुळे नातेवाईकांनी तुम्हाला जसे जमेल तसे करा आम्ही काही तक्रार करणार नाही असे सांगितले. तरीही माझी तारेवरची कसरतच होती. नोकरीलाही तीनच वर्षे झालेली त्यामुळे अनुभव कमी, मी मनातून घाबरलेच होते. मनातल्या मनात देवाचा धावा सुरू होता. मी नातेवाईकांना म्हटले गावातील खाजगी डॉक्टरांना आणा. त्याप्रमाणे त्यांनी आणले, परंतु पेशंटकडून कमाई होणार नाही असे जाणवल्याने त्यांनी मालवणला नेण्याचा सल्ला देऊन निघून गेले.

नंतर मात्र देवाला माझी दया आली असे वाटते. मी दोन तासांपूर्वी कळा याव्यात म्हणून दिलेल्या इन्जेक्शनचा परिणाम दिसू लागला व तिला जोरात कळा सुरु झाल्या, त्यामुळे मी सतर्क झाले. बाळ जिवंत मिळणार नाही हे नातेवाईकांना सांगून हातानेच बाळाची पोझिशन बदलून प्रसुती केली. बाळ जिवंत मिळू न शकल्याने मनाला लागले परंतु बाळंतीण सुखरुप असल्याने सर्वांनी निश्वास सोडला. पूर्ण रात्र तेथेच राहून तिची देखभाल केली. सर्वांनी माझे आभार मानले. असे कटू अनुभव त्याकाळी येत होते पण त्यावेळी राजकारण नव्हते व माणुसकी होती. लोकं एकमेकांना समजून घेत होती. त्यामुळे तक्रारी पण नव्हत्या. असे विविध अनुभव आम्हा नर्सेसना येत होते.

❖

# वाचकांचा पत्रव्यवहार

प्रती,
डॉ. सौ. सुमेधाताई
संपादिका 'हितगुज'
मराठे प्रतिष्ठान, मुंबई.

**सप्रेम नमस्कार**

या वर्षात आमच्या परिवारात दोन विशेष घटना घडल्या. त्या पुढीलप्रमाणे, त्याची प्रसिद्धी मार्च २०१७ च्या अंकात द्यावी ही विनंती.

१. माझा चुलत भाऊ श्री. सतीश मराठे, दादर यांच्या मुलाचा म्हणजे श्री. पुष्कर याचा साखरपुडा अकोला येथील श्री. चंद्रशेखर बुचे यांची कन्या सौ. प्राची हिच्याशी दि. १५-५-२०१६ रोजी झाला. तसेच त्यांचा विवाह सोहळा दि. १४-१२-२०१६ रोजी अकोल्यात झाला व स्वागत समारंभ दि. १७-१२-२०१६ रोजी दादरला पार पडला. वरील कार्यक्रमास मराठे परिवारातील सर्व सदस्य, तसेच श्री. सुरेश प्रभू, श्री. किरीट सोमय्या, व श्री. नितीनजी गडकरी दिल्लीहून खास उपस्थित होते. तसेच सतीश मराठे यांचे सहकारी व बँकिंग क्षेत्रातील अधिकारी उपस्थित होते.

२. मराठे परिवाराचे संमेलन पुणे येथे दि. २१-५-२०१६ रोजी पार पडले. वरील कार्यक्रमास सतीश मराठे यांचा परिवार, मिलिंद मराठे यांचा परिवार व पुण्यातील इतर सदस्य हजर होते. माझे चुलत बंधू श्री. अरुण मराठे, मिरज, श्री. दत्ता मराठे डोंबिवली हजर होते. वयाची ७५ वर्ष पूर्ण केल्याबद्दल खालील व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

अ) श्री. अरुण मराठे, ब) श्रीमती आशा मराठे, क) श्रीमती प्रतिभा मराठे.

तसेच सहकार क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल श्री. सतीश मराठे यांचा सत्कार करण्यात आला.

आपला
**गजानन मराठे** (पृ. १२९)

# माझ्या आठवणीतील पुणे-ठाणे प्रवास

• श्री. आशा मराठे (पृ. १२९), पुणे दूरध्वनी – ०२०–२४२७३०९८/२४२७३०९८

**मा**झे लग्न दि. २१ एप्रिल १९६५ रोजी झाले. माझे माहेर मुंबईत कांजूरमार्ग तर सासर पुण्यात महर्षिनगर. मी सोडून माझे सर्व नातेवाईक मुंबईत राहातात. माझ्या लग्नाच्या अगोदर मला कल्याणच्या पुढचा प्रवास माहीत नव्हता. मात्र दि. २१ मार्च १९६९ ला माझ्या दोन्ही मुलांना घेऊन मला एकटीला प्रवास करायची वेळ आली होती.

माझ्या वडिलांचे मला पत्र आले होते. माझ्या धाकट्या बहिणीला दि. १५ मार्च १९६९ रोजी मुलगा झाला. बाळ व बाळंतीण ठीक आहेत. बहिणीला व भाच्याला भेटण्याची मला खूपच उत्सुकता होती. माझ्या यजमानांना व सासुबाईंना विचारले व जायचे ठरविले. माझी मुलगी दीड वर्षाची व मुलगा सहा महिन्यांचा होता. पण जायची ओढ असल्याने मी जाण्याचे निश्चित केले. माझ्या मोठ्या दिरांनी मला सह्याद्री एक्सप्रेसमध्ये बसवून दिले. त्याच्याआधी मी वडिलांना पत्र पाठवले होते. त्यावेळी सह्याद्री एक्सप्रेस ठाण्याला थांबत नव्हती. माझे दिर मला गमतीने म्हणाले, कल्याणला कोणी उतरवून घेण्यासाठी आले नाही तर?

मी म्हणाले, कल्याणपासून मुंबईपर्यंत माझे नातेवाईक आहेत. मी पत्र पाठविले आहे. त्यामुळे कोणी येणार नाही असे होणार नाही. वडील किंवा भाऊ कोणीतरी नक्कीच येतील. माझ्याजवळ बॅग, मुलीचा डबा, मुलाची दुधाची बाटली व एक छोटी पिशवी होती. मी गजानन महाराजांची पोथी, बरीच वर्षे वाचत होते आणि श्रीराम जयराम जयजय राम असा जप करीत होते.

बोला फुलाला गाठ पडली म्हणतात, तसे मी ज्या डब्यात बसले होते, तो डबा कल्याण स्टेशनच्या बाहेर लागला. एका माणसाने मला मदत केली. त्या माणसाने माझी बॅग घेतली, मुलीला घेतले आणि मी मुलाला घेऊन उतरले. त्या माणसाने आम्हाला कल्याण स्टेशनवर आणून बसवले. सुमारे अर्धा तास मी वाट पाहिली. कोणीही स्टेशनवर आले नाही. तेवढ्यात एक साधा हमाल मला भेटला. मला विचारले, बाई तुम्हाला कोठे जायचे आहे? तोच हमाल दहा मिनिटांनी परत आला, मी म्हटले, पत्र पाठवले आहे. कोणीतरी आम्हाला न्यायला नक्की येईल.

शेवटी मी त्या हमालाला त्याचे व माझे तिकीट काढण्यासाठी पैसे दिले. त्याने तिकीट काढले. मी आणि मुले कांजूरमार्गला वडिलांच्या घरी गेलो. घरी गेले तेव्हा वडील शांतपणे पेपर वाचत बसले होते आणि भाऊ अभ्यास करीत होता. मी मनात खूप रागावले होते. पण वडिलांना हाक मारली, ''काका'' त्यांना आश्चर्यच वाटले. मला म्हणाले, ''आम्हाला न कळवता तू एकटी कशी आलीस?'' आईने औक्षण केले. आम्ही घरात गेलो. वडिलांनी त्या हमालाला २५ रुपये दिले व म्हणाले माझ्या मुलीला व नातवंडांना सुखरूप आणल्याबद्दल धन्यवाद.

गंमत म्हणजे दहा मिनिटांनी पोस्टमन आला व त्याने पत्र दिले. पत्रात सर्व मजकूर लिहिला होता. पण पत्र न मिळाल्यामुळे कोणीही येऊ शकले नाही. त्यादिवशी मी मुलांना आईजवळ ठेवले आणि बहिणीला व भाच्याला भेटून आले. आम्ही सुखरूप पोहोचलो असे पत्र वडिलांनी पुण्याला पाठवले.

मी अजूनही श्रीराम जयराम जयजयराम असा जप करते आणि गजानन महाराज स्तोत्र वाचते. माझी त्यावर श्रद्धा असल्यामुळे गजानन महाराज त्या हमालाच्या रूपात आले असे म्हणावेसे वाटते. ❖



## हसरे हितगुज

**डॉक्टर :** आता तुम्ही अपघातातून पूर्ण बरे झाला आहात. तरी पण तुम्ही घाबरत का आहात?

**पेशंट :** अहो त्यामागे एक कारण आहे.

**डॉक्टर :** काय ते?

**पेशंट :** ज्या ट्रकने माझा अपघात झाला होता त्याच्या मागे लिहिलं होतं 'फिर मिलेंगे'

---

**ठमाकाकू :** काय करावं या स्मरणशक्तीला...

**गंपूकाका :** काय झालं?

**ठमाकाकू :** बदाम भिजत घातले होते स्मरणशक्ती वाढवण्यासाठी... पण कुठे ठेवलेत, तेच आठवत नाही!!

# पंचाहत्तरी

• सौ. वृषाली वामन मराठे, (पृ. ५०३) भ्रमणध्वनी – ९३२४७८०३४५

प्रतिष्ठानने जून २०१६ महिन्यातील अंकात केलेल्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून माझा हा प्रयत्न.

मी सौ. वृषाली वामन मराठे पूर्वाश्रमीची कल्पना बेहेरे, नुकतेच ७०व्या वर्षात पदार्पण केले. मध्यम वर्गीय परिस्थितीतील आम्ही तिघी बहिणी. आई वडील ठाण्याला राहात होते. मी एसएससीला असताना आईचे निधन झाले. तेव्हा ताई १८ वर्षांची मी १६ वर्षांची व धाकटी बहीण १३ वर्षांची होती. आईच्या निधनानंतर वडिलांनी आई आणि वडील दोन्ही भूमिका फार चांगल्या रीतीने निभावल्या. यथावकाश आमची शिक्षणे, नोकऱ्या, लग्न पार पडली. त्यावेळी आम्ही गोरेगावला राहात होतो.

वयाच्या पंचविशी नंतर माझ लग्न श्री. वा.ग. मराठे यांच्याशी झाले. लग्नानंतर १ वर्ष आम्ही बोरीवलीला यांच्या आत्याच्या घरात राहिलो. माझ्या धाकट्या बहिणीचे लग्न पुण्यातील स्थाईक श्री. दामले यांच्याशी झाले. वडील एकटेच राहातील म्हणून आम्ही दोघे गोरेगावला राहायला आलो ते कायमचेच. यथावकाश पुष्कराजचा जन्म झाला. त्याचे बालपण ते कॉलेज शिक्षण गोरेगावच्या जागेतच झाले. त्या सर्व वेळी मला वडिलांची आणि यजमानांची साथ मिळाली. माझी नोकरी खाजगी असल्याने रजा कमी मिळत होत्या. पुष्कराजला वेळेवर खायला देणे, शाळेत पाठवणे वडिलच करीत. तसेच घरी आल्यावर त्याचे सर्व आवरून तो खेळायला गेला की वडील फिरायला जात. येतांना दूध घेऊन येत.

आईच्या नंतर वडील २९ वर्ष जगले. वक्तशीर राहाणं, नियमित खाणेपिणे त्यामुळे आजारपण त्यांच्या वाट्याला आले नाही. शेवटी २० दिवसच आजारी पडले. काही दिवस हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केल्यावर २३ ऑक्टोबरला आमचे पितृछत्र हरपले. त्यावेळी जावयांनी त्यांची खूप सेवा केली.

आम्ही १९९६ साली गोरेगाव सोडले. पुष्कराजला बीई झाल्यावर एका सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी लागली. २००३ साली त्याचं लग्न झाले. सौ. गौरी आमच्या घरात आली. तिच्यामुळे आमची मुलीची हौस पूर्ण झाली. आमचे चौकोनी कुटुंब झाले. त्यानंतर २००६ मध्ये त्याला पुण्यात चांगली नोकरी मिळाली म्हणून ती दोघं पुण्यात आली. आमचे मधूनमधून पुण्याचे दौरे चालू झाले. २००८ साली तेजश्रीचा जन्म झाला. आमची नात म्हणजे १०० टक्के मराठे, दिसायला सुरेख, हुशार पण तितकीच हट्टी. त्यामुळे रोज घरात लूटूपुटूची भांडणे चालू असतात. आता घरात मल्हारचे आगमन झाले आहे. तो २ वर्षाचा होईल. ताई सारखाच हुषार पण जास्त लबाड आहे. आपल्या बोलण्याने प्रत्येकाला आपलेसे करणारा. खाली सोसायटीत फिरायला गेला की पक्षी, प्राणी, वॉचमेन, ड्रायव्हर प्रत्येकाला हायहॅलो चालू असते. आता षटकोनी कुटुंब झालं आहे.

घरात कुठलीही गोष्ट एकमेकांच्या सल्ल्याने होते. माझे आणि गौरीचे छान मेतकुट जमते. त्यामुळे गृहखाते आमच्याकडे आणि अर्थखाते पुष्कराज आणि ह्यांच्याकडे. पण आमच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या जातात.

आता आयुष्याच्या संध्याकाळी आपल्या माणसात खऱ्या अर्थाने मजा करा असे मस्त जीवन जगत आहे. ❖




- थंडीत डोसे-इडलीचे पीठ फुगण्यासाठी पिठात रात्री कांदा दोन फोडी करून टाका.
- गूळ नेहमी प्लॅस्टिकच्या पिशवीत पॅक करून मग डब्यात ठेवा. ओलसर होणार नाही.
- नारळाच्या घासणीचा अंघोळीच्या वेळी स्क्रबरप्रमाणे छान वापर होतो.
- चिंच, लिंबू, आमसूल इत्यादींचा मिठासह वापर केल्यास तांबेपितळाची भांडी घासण्यासाठी छान उपयोग होतो.
- लिंबाच्या फोडी किंवा साली न फेकता कुकरमध्ये टाकल्यास कुकर आतून काळा न पडता स्वच्छ राहतो.
- नारळाच्या काथ्यासारख्या सालीचा भांडी घासण्यासाठी वापर करा.
- तारेच्या घासणीने ॲल्युमिनिअमचा तवा घासल्यानंतर डोसे करताना ते चिकटतात. घासलेल्या तव्यावर प्रथम पोळ्या करून तो थोडा वापरला की डोसे छान होतात.

# आशिया खंडातील सर्वात लांब काश्मीर मधील चेनानी नशरी बोगदा

• श्री. रमाकांत विद्वांस, कार्याध्यक्ष (पृ. ६२३), माटुंगा दूरध्वनी – ०२२-२४३०५२६०


**का**श्मीरमधील चेनानी नशरी या बोगद्याच्या कामास, इंटरनॅशनल टनेलिंग ॲसोसिएशनने बेस्ट टनेल ऑफ द इयर हा पुरस्कार जाहीर केला आहे. या कामाचा तांत्रिक सल्लागार म्हणून डिझाइन, प्लॅनिंग आणि कन्स्ट्रक्शन या सर्व कामात माझा सक्रीय सहभाग होता, ही माझ्यादृष्टीने खूप अभिमानास्पद गोष्ट आहे.


चेनानी कि.मी. ८९ आणि नशरी कि.मी. १३० ही दोन्ही गावे काश्मीरमधील – जम्मू श्रीनगर – एन.एच.४४ महामार्गावर साधारण १,२०० मी. उंचीवर वसलेली आहेत. सध्या या दोन गावांना जोडणारा ४१ कि.मी. लांब दूपदरी व वेडीवाकडी वळणे असलेला रस्ता २,००० मी. उंचीवरील पटणीटॉप या थंड हवेच्या ठिकाणातून आणि 'पतीसा' या मिठाईसाठी प्रसिद्ध असलेल्या कुद गावातून जातो. पटणीटॉपला हिवाळ्यात खूप बर्फ आणि पावसाळ्यात खूप पाऊस पडतो. बर्फ आणि भूस्खलन यामुळे दरवर्षी तीन ते चार महिने वाहतूक बंद राहाते. सध्या चेनानी ते नशरी या प्रवासास दोन ते तीन तास लागतात.

हा खडतर प्रवास टाळण्यासाठी भारत सरकारने ९ कि.मी. लांब चेनानी नशरी बोगद्याचे काम सन २०११ मध्ये हाती घेतले. या कामात १२ मी. रुंद मुख्य बोगदा, त्याला समांतर तितक्याच लांबीचा ५.५ मी. रुंद आपत्काळात वापरण्याचा बोगदा आणि दर ३०० मी. वर या बोगाद्यांना जोडणारे ५४ मी. लांब बोगदे याचा समावेश आहे. चेनानी नशरी बोगदा हा सध्या आशियातील सर्वात लांब रस्त्याचा बोगदा आहे.

हे अतिशय अवघड आणि आव्हानात्मक काम मुंबईच्या इन्फ्रास्ट्रक्चर लीसींग ॲण्ड ट्रान्सपोर्टेशन सर्विसेस लि. आय. एल. एफ. एस. या कंपनीच्या आय. एल. एफ. एस. ट्रान्सपोर्टेशन नेटवर्क लि. आय. टी.एन. एल. या उपकंपनीने आखणी करा, स्वखर्चाने बांधा, चालवा आणि हस्तांतरीत करा या DBFOT तत्वावर पूर्ण केले आहे. या अतिशय अवघड आणि आव्हानात्मक कामाची पूर्तता करण्याबद्दल कौतुक म्हणून इंटरनॅशनल टनेलिंग ॲसोसिएशनने बेस्ट टनेल ऑफ द इयर हा पुरस्कार जाहीर केला आहे.

आता सन २०१७ मध्ये हा चेनानी नशरी बोगदा वापरात





आल्यावर, सध्याच्या ४१ कि.मी लांबीचा दोन ते तीन तास खाणारा हा प्रवास केवळ ८ ते १० मिनिटात पुरा करता येईल. या बोगद्यामुळे अंतर ३२ कि.मी कमी होईल तर ८००मी. चे चढउतार टळतील आणि जवळ जवळ अडीच तासाचा वेळ वाचेल. तसेच हिवाळ्यातही वाहतूक चालू राहू शकेल.

❖



## ।। कन्यारत्न ।।

श्री. गोविंद ना. मराठे व सौ. गीता गो. मराठे तिस्क उसगांव, गोवा यांचा मुलगा चि. अमित व सौ. विभा यांना दि. १४/२/२०१७ रोजी (अंगारकी संकष्टी) दुपारी १२ वा. १९ मि. या शुभदिवशी पुणे येथे कन्यारत्न झाले. श्रीमती वंदना कुलकर्णी गोवा (सौ. विभाच्या मातोश्री) यांना नात झाली. समस्त हितगुज व मराठे परिवाराला आमच्याकडून हार्दिक शुभेच्छा!

# गोमन्तक मराठे परीवार संमेलन

• सौ. शुभदा दीपक, (पृ. ५३३), गोवा

दि. १ जाने. २०१७ रोजी गोमन्तक मराठे परीवार संमेलन सतरी तालुक्यातील धारखंड या निसर्गरम्य गावात श्री. अरुण शिवराम यांच्या निवासस्थानी संपन्न झाले. संमेलनाला उपस्थिती खूप चांगली होती, व्यवस्थाही खूप छान केली होती.

संमेलनाध्यक्ष होते श्री. अरुण शिवरामांचे ज्येष्ठ बंधू श्री. विनायकराव तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री. श्रीधर काका जोग यांना पाचारण केले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सौ. अपूर्वा अरुण यानी नेटक्या शब्दात केलेल्या उपस्थितांच्या स्वागताने झाली. प्रास्ताविक व अहवालवाचन व मागील वर्षातील हिशेबाचा आढावा कार्यवाह श्री. अरुण रमाकांत यांनी घेतला. आजच्या संमेलनातील प्रमुख विषय होता 'करविषयक आर्थिक नियोजन' – माहिती चर्चा व प्रश्नोत्तरे सीए श्री. रोहीत दीपक मराठे यांनी तब्बल सव्वा तास वरील विषयाचा अत्यंत नेटक्या शब्दात व्यवस्थित विवेचनासहित संपूर्ण आढावा घेतला. त्यासाठी विविध उदाहरणेही दिली विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरेही दिली. एकंदर कार्यक्रम खूपच रंगला सर्वांना खूप आवडलाही. दूसरे सत्र – प्रा. विनय बापट यांनी, 'मराठे परीवार एकत्र कसा येईल', तसेच आपल्या समाजावर होणारे सांस्कृतिक आक्रमण या विषयांवर खूपच उपयुक्त माहिती दिली. ब्राम्हणांच्या चाललेल्या निंदानालस्तीवरही चर्चा झाली. आपल्या समाजावर जर कोणी बिनबुडाचे आरोप करत असतील तर त्यांना आत्मविशासपूर्णतेने जाब विचारावा. कारण आपण कुठेही कमी नाही आहोत. विषय खूप छान रंगला. सर्वांना भावला. शेवटी त्यानी सांगितले की परिवाराने काहीतरी विधायक कार्य करावे जेणेकरून परिवारात असण्याचे समाधान वाटेल. हा सल्ला खरेच मोलाचा वाटला. यासाठी एखादा गाव, शाळा, किंवा बालवाडी दत्तक घ्यावी व तिथे योग्यदान द्यावे आदर्श निर्णयाचा आनंद लुटावा परीवार ??? लागेल. तिसरे सत्र होते खुल्या चर्चेचे यात सर्वप्रथम विषय घेण्यात आला होता – गोमन्तक मराठे परिवाराची कायदेशीर नोंदणी करणे. याच्यावर अगदी उलटसुलट चर्चेनंतर सर्वानुमाने कायदेशीर नोंदणी व्हावी यावर शिक्कामोर्तब करण्यात आला. दुसरा जिव्हाळ्याचा विषय होता – आपल्या मुलामुलींवर चांगले संस्कार घडवावे, जेणेकरून ती वाममार्गाला लागणार नाहीत. आपले ब्राह्मण्य टिकवून ठेवतील. हा विषय सर्वांच्या मर्म स्थानावरचा असल्याने सर्वांनाच आपुलकीचा वाटला.

सत्राच्या शेवटी विद्यमान कार्यकारीणीला तीन वर्षे पूर्ण होत असल्याने नूतन कार्यकारीणी निवडण्यात आली. तसेच कार्यकारीणीचा अध्यक्ष हाच परीवाराचा प्रतिनिधी असतो. असे संबोधण्यात आले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी श्री. कालीदास काका होते. कार्यकारीणी खालीलप्रमाणे निवडण्यात आली. १. अध्यक्ष – सौ. शुभदा दीपक, २. कार्यवाह – श्री. प्रसाद (विष्णू) मराठे, ३. कोषाध्यक्ष – श्री. अरुण शिवराम • **सदस्य** : १. श्री. प्रदीप अनंत, २. श्री. प्रकाश विनायक, ३. श्री. संतोष (नारायण) काशिनाथ. • **सल्लागारपदी** : १. डॉ. सौ. अपूर्वा अरुण यांची निवड करण्यात आली. पुढील तीन वर्षांसाठी वरीलप्रमाणे कार्यकारीणी राहील. मावळत्या अध्यक्षांचे समारोपाचे भाषण झाले. तद्नंतर सर्वांनी स्नेहभोजन घेतले. चहापानानंतर सर्वजण मार्गस्थ झाले. ❖

# पुणे शाखेचा वर्धापनदिन

• माधव वासुदेव मराठे (पृ. ३८६), पुणे भ्रमणध्वनी : ९०२२४१७०२१

मराठे प्रतिष्ठानच्या पुणे शाखेचा वर्धापनदिन २६ जानेवारी रोजी सायंकाळी वेदशास्त्रोत्तेजक सभागृहात अत्यंत उत्साहात साजरा झाला. सर्व सभासदांचे व त्यांच्या कुटुंबियांचे स्वागत सौ. आसावरी व सौ. उर्मिला मराठे या तीळगूळ व अत्तराची कुपी देऊन करत होत्या. या स्वागतामुळे प्रसन्न मनाने सर्वजण सभागृहात प्रवेश करत होते. सौ. अंजली मराठे यांनी सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाची व पुण्यातील कार्याची माहिती सांगितली. आपल्या ज्या कुलबांधवांचे व भगिनींचे गेल्या वर्षभरात निधन झाले त्या सर्वांना श्रद्धांजली वाहाण्यात आली. अखिल भारतीय कार्यकारिणीचे पुण्यातील सभासद तसेच मुंबई




व्यवस्थापक मंडळ

कार्यकारिणीचे काही सदस्य खास या कार्यक्रमासाठी आले होते; त्यांचे स्वागत वा. ग. मराठे यांचे हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात

आले. कु. स्वराली मराठे यांनी बहारदार कथक नृत्य सादर करून सर्वांची वाहवा मिळवली. पुण्याचे निवडून आलेले नवीन व्यवस्थापक मंडळाचे सदस्य सर्वश्री एअर कमोडर मधुकर कृष्ण मराठे, श्रीनिवास गोपाळ मराठे, गजानन चिंतामण मराठे, श्रीकृष्ण सिद्धेश्वर मराठे, गणेश अनंत मराठे, चंद्रशेखर जयंत विद्वांस, सौ. स्वाती प्रमोदन मराठे या सर्वांचा परिचय सहकार्याध्यक्ष विजय मराठे यांनी करून दिला व त्या सर्वांचा सत्कार श्री अरुणराव मराठे यांच्या हस्ते गुलाबपुष्प व श्रीफळ देऊन करण्यात आला. विजय बागूल यांचा माऊथ ऑर्गन वादनाचा अत्यंत सुरेल असा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात त्यांनी अनेक नामवंत हिंदी चित्रपटांतील अनेक लोकप्रिय गाणी सादर केली. त्यांना निवेदनाची साथ त्यांच्या पत्नी सौ. वृषाली यांनी दिली. हा कार्यक्रम सर्वांना खूपच भावला. गुळपोळी व पराठे या अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. मोठ्या संख्येने पुण्यातील सभासद या कार्यक्रमास आवर्जून आले होते. ❖


कु. स्वराली मराठे


उपस्थित कुलबांधव प्रेक्षक

## वर्षागीते : काव्य स्पर्धा :

**सभासदांच्या कलागुणांना उतेजन देण्यासाठी मराठे प्रतिष्ठान आयोजित करीत आहे एक काव्य स्पर्धा: पाऊस व वर्षा ऋतू यांच्याशी संबंधित काव्य/गीते स्पर्धकाने सादर करावीत ही अपेक्षा आहे. आपले साहित्य कागदाच्या एका बाजूस सुवाच्य हस्ताक्षरात लिहून १५ मे २०१७ पर्यंत 'हितगुज' संपादिका सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांच्या पत्त्यावर पाठवावे. (पत्ता मुखपृष्ठावर दिला आहे) सभासदांनी या अनोख्या उपक्रमास भरघोस प्रतिसाद देऊन ही स्पर्धा यशस्वी करावी असे आवाहन या संकल्पनेचे प्रणेते पुण्याचे ज्येष्ठ सभासद श्री. माधव मराठे यांनी केले आहे.**

***विजेत्या कविता 'हितगुज' जून २०१७ मध्ये प्रसिद्ध करण्यात येतील***

**पारितोषिके : प्रथम: रु. १५०१/-; द्वितीय: रु. १००१/- तृतीय: रु. ५०१/-**

**BOOK POST**

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : hitguj@marathepratishthan.org • वेबसाईट : www.marathepratishthan.org